दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३३९ सोमवार दि.१७ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-339 Monday, Dt.17 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# आता यूजीसी-नेटच्या ३ विषयांची परीक्षा रद्द

## एनटीएचा सावळागोंधळ पुन्हा चव्हाट्यावर, प्रश्नपत्रिकांमध्ये गंभीर त्रुटी, फेरपरीक्षा होणार

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

प्रश्नपत्रिकांमध्ये गंभीर त्रुटी आणि चुका आढळून आल्याने यूजीसी-नेटच्या ३ विषयांची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) आज घेतला. इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या ३ विषयांची परीक्षा रद्द करण्यात आली. आता या ३ विषयांची फेरपरीक्षा होणार असून, एनटीएने त्याचे वेळापत्रकही जाहीर केले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा एनटीएचा सावळागोंधळ चव्हाट्यावर आला आहे.

परीक्षा रद्द करण्यात आलेल्या ३ विषयांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये गंभीर त्रुटी किंवा अनेक चुका आढळून आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर एका तज्ज्ञ समितीने केलेल्या शिफारशींनुसार अखेर नॅशनल टेस्टिंग एजन्सीने इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या विषयाची फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने एक्सवर एक निवेदन प्रसिद्ध करीत या संदर्भातील माहिती दिली. यूजीसी नेटच्या विद्यार्थ्यांना आता या ३ विषयांची परीक्षा पुन्हा द्यावी लागणार आहे.

यूजीसी नेटच्या ३ विषयांच्या फेरपरीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क विद्यार्थ्यांना द्यावे लागणार नाही. तसेच इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र विषयांच्या परीक्षा ९ आणि १० सप्टेंबर रोजी होतील, अशी माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने दिली. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने २२ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत देशभरात एकूण ८७ विषयांसाठी परीक्षा घेतल्या होत्या.

या परीक्षा संपल्यानंतर इंग्रजी, वाणिज्य आणि समाजशास्त्र या विषयांच्या



प्रश्नपत्रिकांबाबत विद्यार्थ्यांनी अनेक तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर याबाबत सखोल चौकशी करण्यासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर समितीने तपासणी केल्यानंतर या विषयांच्या प्रश्नपत्रिकांमध्ये गंभीर चुका आढळून आल्या होत्या.

### प्रश्नपत्रिकांमध्ये होत्या गंभीर चुका

प्रश्नपत्रिकांमध्ये तथ्यात्मक चुका, भाषांतरातील चुका आणि व्याकरणाच्या गंभीर चुका होत्या. शिवाय काही विचारवंत आणि अभ्यासकांची नावेही चुकीच्या पद्धतीने छापली गेली होती. तसेच अनेक जुने प्रश्न जसेच्या तसे विचारले गेले होते. याबाबत चौकशी समितीने आपल्या अहवालात फेरपरीक्षा घेणे हाच एकमेव पर्याय आहे, असे म्हटले. त्यामुळे एनटीएने या ३ विषयांच्या फेरपरीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला.



**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी येथील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आणि प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्य दिनानिमित्त शनिवार दि.१५ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यालयाच्या प्रारंगणामध्ये ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**

**संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा चौसाळा विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या शुभहस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय राष्ट्रीय तिरंगा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. वंदे मातरम,राष्ट्रगीत,राज्य गीताचे गायन झाल्यानंतर मान्यवरांना आरएसपी व स्काऊट गाईड पथकाने मानवंदना दिली.**

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे विदर्भ अध्यक्ष अनुपकुमार भार्गव यांचे दुःखद निधन

## पत्रकारितेची बुलंद तोफ हरपली - डॉ. विश्वास आरोटे

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे विदर्भ अध्यक्ष तथा पुलगाव टाइम्सचे मुख्य संपादक अनुप कुमार भार्गव सर यांच्या आकस्मिक निधनाची दुःखद वार्ता अत्यंत मन हेलावून टाकणारी आहे.

पत्रकारिता क्षेत्रात निर्भीड लेखणी, परखड विचार आणि कणखर नेतृत्वाची ओळख निर्माण करणारे, पत्रकारांच्या हक्कांसाठी सदैव आवाज उठविणारे आणि संघटनेला बळ देणारे विदर्भ पत्रकार संघटनेचे बुलंद नेतृत्व आज काळाच्या पडद्याआड गेले.

अनुप कुमार भार्गव सर म्हणजे केवळ एक पत्रकार नव्हते, तर अनेक पत्रकारांसाठी मार्गदर्शक, आधारवड आणि प्रेरणास्थान होते. त्यांच्या कार्यातून पत्रकारिता क्षेत्राला नवी दिशा मिळाली. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईसह संपूर्ण विदर्भातील पत्रकारिता क्षेत्राची न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

त्यांची निर्भीड लेखणी, संघर्षशील वृत्ती, पत्रकारांच्या प्रश्नांसाठीची तळमळ आणि आपुलकीचे व्यक्तिमत्त्व सदैव स्मरणात राहील. त्यांचे विचार आणि कार्य हीच त्यांच्या स्मृतींना खरी आदरांजली ठरेल अशी भावना पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ संपादक पत्रकार अनुप कुमार भार्गव हे व्यक्तिमत्व एक बुलंद तोफ होते.



अन्यायाविरुद्ध प्रखरपणे लढण्याची त्यांची वृत्ती होती.त्यांचे दैनिक शासनमान्य यादीवर परत यावे यासाठी त्यांनी सोळा वर्ष संघर्ष केला. अवघ्या तीन महिन्यापूर्वी या संघर्षाला न्याय मिळाला आणि त्यांचे वृत्तपत्र महाराष्ट्र शासनाच्या शासनमान्य यादीवर आले होते. मात्र दुर्दैवाने याचा लाभ आणि आनंद त्यांच्या नशिबाने हेरावला.विदर्भाचे रत्न अचानक हरपल्याने वर्धा सह विदर्भाचे आणि पत्रकारिता क्षेत्राची मोठी हानी झाली असून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे एक निष्ठावंत लढाऊ व्यक्तिमत्व कायमच हरवल्याने मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त करून मराठवाडा विभागाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी व्यक्त केली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ‘पैशाचं झाड’ लक्ष्यवेधी आंदोलन

## वनविभागातील गैरव्यवहारांची चौकशी करण्याची मागणी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वनविभागातील वनीकरणासह इतर कामांमध्ये सुरू असलेल्या अनागोंदी कारभार, अनियमितता आणि गैरव्यवहारांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली १५ आगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'वनविभागातील झाडांना पैसे' हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात डॉ. गणेश ढवळे यांच्यासह माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस चऱ्हाटकर आणि मुजीब इनामदार यांनी सहभाग घेतला. हरित अभियानांतर्गत ४२ कोटी रुपये खर्च करून कागदोपत्री वृक्षलागवड करण्यात आल्याचा आरोप करत या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी आंदोलनकर्त्यांनी पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे केली आहे.यावेळी प्रादेशिक विभागीय वन अधिकारी अमोल गर्कळ यांच्या कार्यकाळातील कामांची चौकशी करण्यात यावी, तसेच त्यांच्या संपत्तीची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, वनविभागातील भ्रष्टाचार आणि अनियमिततेसंदर्भात सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संघटना आणि लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा लेखी निवेदने देऊन चौकशीची मागणी केली आहे. मात्र, जिल्हा प्रशासन आणि वनविभागातील वरिष्ठ अधिकारी या प्रकरणाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला.




# महावितरणचा वीजचोरांना तडाखा, राज्यात १९ हजारांवर वीजचोऱ्या उघड

मुंबई ।प्रतिनिधी

महावितरणने वीजचोरीविरुद्ध राज्यभरात धडक मोहीम सुरु केली असून गेल्या चार महिन्यांमध्ये घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक तसेच इतर वर्गवारीमध्ये १९ हजार ५९९ ठिकाणी वीजचोरी उघड झाली आहे. यामध्ये गेल्या जुलै महिन्यात पर्दाफाश झालेल्या तब्बल ११ हजार ३२ वीजचोऱ्यांचा समावेश आहे. थेट तारेच्या हूकद्वारे व मीटरमध्ये फेरफार केलेल्या १५ हजार ९६५ प्रकरणांत ३० कोटी ३६ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे आढळून आले तर उर्वरित ३ हजारांवर ६३४ प्रकरणांचे मूल्यांकन सुरु आहे.

गेल्या एप्रिल महिन्यापासून महावितरणने घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीजजोडण्यांची धडक तपासणी मोहीम सुरु केली आहे. यामध्ये सर्वाधिक कोकण प्रादेशिक विभागात ७४९६, नागपूर- ४५२१, छत्रपती संभाजीनगर- ४५९७ आणि पुणे प्रादेशिक विभागात २९८५ अशा एकूण १९ हजार ५९९ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. यापैकी १५ हजार ९६५ वीजचोऱ्यांचे मूल्यांकन झाले असून ३० कोटी ३६ लाख रुपयांच्या वीजचोरीचे बिल संबंधित ग्राहकांना देण्यात आले आहे. त्यातील ६६२९ ग्राहकांनी १४ कोटी १२ लाख रुपयांचा भरणा केला आहे. तसेच सर्वच वीजचोरी प्रकरणी तडजोड शुल्काच्या दंडाची रक्कम देखील आकारण्यात येत आहे. आतापर्यंत ४९५९ प्रकरणांत १ कोटी ८५ लाखांचे तडजोड शुल्क आकारण्यात आले आहे.

वितरण व वाणिज्यिक हानी कमी करण्यासाठी वीजचोरीविरुद्ध एप्रिलपासून मोहीम सुरु करण्यात आली आहे. एप्रिल ते जूनपर्यंत ८ हजार ५६७ वीजचोऱ्या उघड झाल्या होत्या. दि. १ जुलैपासून आणखी तीव्र झालेल्या या धडक मोहिमेत ११ हजार ३२ ठिकाणी थेट तारेच्या हूकद्वारे किंवा मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या चोरांना महावितरणने दणका दिला आहे. यातील ८४६२ ठिकाणी विजेच्या चोरीचे मूल्यांकन झाले असून संबंधितांना १५ कोटी ११ लाख रुपयांचे वीजबिल देण्यात आले आहे. त्यापैकी ३०३६ प्रकरणांत ६ कोटी २२ लाख रुपयांचा वीजबिल भरणा झाला आहे. तर उर्वरित प्रकरणांत चोरीद्वारे वापरलेल्या युनिटनुसार वीजबिल व दंडात्मक तडजोड शुल्क आकारण्याचे (मूल्यांकनाचे) काम सुरु आहे.

गेल्या जुलै महिन्यात छत्रपती संभाजीनगर- २३६५, कोकण- ४०८४, नागपूर- २३२४ आणि पुणे प्रादेशिक विभागात २२५९ अशा एकूण ११ हजार ३२ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. त्यातील ८४६२ वीजचोऱ्यांच्या मूल्यांकनातून १५ कोटी ११ लाख रुपयांची वीजचोरी झाल्याचे स्पष्ट झाले व संबंधितांना त्याचे वीजबिल देण्यात आले आहे. आतापर्यंत ३०३६ प्रकरणांत ६ कोटी २२ लाख रुपयांचे तडजोड शुल्क देखील आकारण्यात आले आहे.

वीजचोरीच्या संपूर्ण रकमेचा दंडासह मुदतीत भरणा केला नाही तर संबंधित वीजचोरांविरुद्ध भारतीय विद्युत कायद्याचे कलम १३५ नुसार फौजदारी कारवाई करण्यात येत आहे. भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार वीजचोरीच्या गुन्ह्यासाठी दंड व तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे. सध्या थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी सुरू आहे. थकबाकीदारांनी अन्य ठिकाणाहून वीजवापर केल्याचे आढळून आल्यास वीजचोरीची कारवाई करण्यात येत आहे.

# महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर आयोजन

**शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर या उपक्रमाचे असून मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सेक्युअर टूमारो अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात २१ ऑगस्ट रोजी कमाल ३ किलोमीटर (महा वॉकेथॉन) चालणे आणि मृद व जलसंधारणाची शपथ घेणे असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.**

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान ‘जलसंधारण सप्ताह’ आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान जलसंधारण अभियान आयोजित करण्यात येत आहे. तर २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत ‘महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर’ या उपक्रमाचे आयोजन करुन जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले असून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या लोकचळवळीत राज्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे होणार असून प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रमुख जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी हे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री, राज्यसभा/ लोकसभा/ विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/उपाध्यक्ष, सर्व महापौर / उपमहापौर, सर्व नगराध्यक्ष/उपनगराध्यक्ष, सर्व जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य, सर्व महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत सदस्य आणि इतर स्थानिक लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.

सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील नामांकित व प्रतिष्ठित व्यक्ती / डॉक्टर / कलाकार/ उद्योजक, जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब सदस्य, लायन्स क्लब सदस्य, रनिंग क्लब सदस्य, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, विविध व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला, राज्याचे नागरिक यांना सहभागी करण्यात येणार आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# दूध, दुधाचे पदार्थ महागले!

वाढत्या उत्पादन खर्चाचा मोठा फटका आता थेट सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार आहे. दूध विक्री दरामध्ये प्रति लिटर २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या सभासदांच्या बैठकीत शनिवारी घेण्यात आला. केवळ दूधच नाही, तर बाजारातील विविध दुग्धजन्य पदार्थांच्या दरामध्येही १० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचे या बैठकीत निश्चित करण्यात आले. ही नवीन दरवाढ ११ ऑगस्ट (मंगळवार)पासून लागू झाली. त्यामुळे ग्राहकांना आता दुधासाठी अधिकचे पैसे मोजावे लागणार आहेत. पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे (कात्रज डेअरी) अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत दूध व्यवसायावर पडत असलेल्या वाढत्या आर्थिक बोजाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. डिझेलच्या दरात प्रतिलिटर सुमारे १० रुपयांची झालेली वाढ, साखरेच्या दरात प्रतिकिलो १२ रुपयांची झालेली वाढ आणि पॅकिंगच्या एकूण खर्चात झालेली ३० टक्क्यांहून अधिक वाढ यामुळे दुग्ध व्यवसायाची प्रक्रिया आणि वाहतूक खर्च कमालीचा वाढल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

याशिवाय, अलिकडे दूध खरेदी दरात झालेली वाढ आणि आगामी काळात दूध खरेदी दरामध्ये आणखी वाढ होण्याची दाट शक्यता लक्षात घेऊनच अखेर हा दरवाढीचा निर्णय घ्यावा लागल्याचे दूध संघांकडून सांगण्यात आले. सहकारी आणि खासगी दूध संघांचे सुमारे २० प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते. डिझेल, साखर आणि पॅकिंग साहित्याच्या दरवाढीमुळे ओढवलेल्या या संकटामुळे दूध संघांना हा दरवाढीचा निर्णय घेणे भाग पडले असून, याचा थेट परिणाम आता गृहिणींच्या बजेटवर होणार आहे. 'गोकुळ'ने म्हैस दूध खरेदी दरात प्रतिलिटर दीड रुपये तर गाय दूध खरेदी दरात एक रुपया दरवाढ केली आहे. ही दरवाढ मंगळवार (११ ऑगस्ट) पासून लागू झाली. म्हैस दूध विक्री दरात प्रतिलिटर दोन रुपये वाढ केली आहे. गायीच्या दूध विक्रीदरात वाढ केलेली नाही. गोकुळ संलग्न ७५०० दूध संस्थांच्या माध्यमातून दररोज १४ ते १५ लाख लिटर दूध संकलन केले जाते. यंदा पावसाळा लांबला असून अनेक ठिकाणी कमी-जास्त प्रमाणात पाऊस सुरू आहे. यामुळे ओल्या चा-याची कमतरता निर्माण झाली आणि त्याचा परिणाम दूध उत्पादनावर झाला. याचा आर्थिक फटका शेतक-यांना बसत असल्याने दूध खरेदी दरात वाढ करण्याचा निर्णय 'गोकुळ'ने घेतला. विक्री दरातील वाढ ही कोल्हापूरसह पुणे, मुंबईसाठीही लागू असणार आहे. दूध खरेदी दरात यापूर्वीच वाढ झाली आहे. पुढील काळात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

त्यामुळे खरेदी प्रक्रिया, वेष्टन आणि वाहतूक दरात झालेल्या दरवाढीचा विचार करून दूध विक्री दरात प्रतिलिटर २ रुपये आणि दुग्धजन्य पदार्थांच्या दरात १० टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# प्रलंबित महसुली प्रकरणांच्या तडजोडीसाठी १ सप्टेंबरपासून
## 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान'

मुंबई ।प्रतिनिधी

महसूल विभागांतर्गत प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे परस्पर सहमतीने आणि तडजोडीने निकाली काढण्यासाठी राज्यभरात दि. १ सप्टेंबर २०२६ ते दि. ३१ मार्च २०२७ या कालावधीत 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येणार आहे. महसूल विभागामार्फत यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

या अभियानात मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) तसेच अपर जिल्हाधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या महसुली दाव्यांचा आणि अपिलांचा समावेश असेल. सर्व स्तरांवर तीन महिन्यांतून एकदा महसूल लोक अदालत आयोजित करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.ज्या अर्धन्यायिक न्यायालयात किंवा कार्यालयात महसुली दावा प्रलंबित असेल, तेथे दोन्ही पक्षकारांना स्वतः किंवा त्यांच्या वकिलांमार्फत तडजोडीसाठी अर्ज सादर करता येईल. प्राप्त अर्जांची छाननी करून दोन्ही पक्षांच्या संमतीची खात्री केली जाईल आणि त्यांच्याकडून कायदेशीर तडजोडनामा घेण्यात येईल. निश्चित केलेल्या लोक अदालतीच्या दिवशी दोन्ही पक्षांच्या सहमतीने अंतिम आदेश पारित करून प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढण्यात येईल. पक्षकारांना नोटीस देणे, अर्ज स्वीकारणे, अर्जांची छाननी, तडजोडनामा तयार करणे, पूर्वतयारी बैठक घेणे आणि प्रत्यक्ष महसूल लोक अदालत आयोजित करणे यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत वेळापत्रक निश्चित करण्यात येईल.

जमिनींशी संबंधित महसुली दावे दीर्घकाळ प्रलंबित राहिल्याने पक्षकारांचा वेळ आणि पैसा खर्च होतो. एका स्तरावरील निकालानंतर अपील किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल झाल्याने प्रकरणे वर्षानुवर्षे सुरू राहतात. विधी सेवा प्राधिकरणाच्या लोक अदालतीच्या धर्तीवर परस्पर तडजोडीतून ही प्रकरणे निकाली काढल्यास पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाचण्याबरोबरच अर्धन्यायिक यंत्रणेवरील ताणही कमी होणार आहे. पुणे जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'महसूल लोक अदालत' उपक्रमाला मिळालेल्या यशस्वी प्रतिसादाच्या पार्श्वभूमीवर हे अभियान आता राज्यस्तरावर राबविण्यात येत आहे.

क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून आणि समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत न्याय आणि हक्क पोहोचविणे या त्यांच्या विचारांच्या मूळ सूत्राच्या अनुषंगाने या अभियानाला त्यांचे नाव देण्यात आले आहे.महसूल विभागांतर्गत अर्धन्यायिक प्रकरणे प्रलंबित असलेल्यांनी या लोक अदालतीचा लाभ घेऊन तडजोडीने प्रकरण निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत, असे आवाहन महसूल विभागामार्फत करण्यात आले आहे.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊ व शालेय साहित्य वाटप

खानापूर ग्रामपंचायतीत महापुरुषांचे पूजन, ध्वजारोहणासह स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

माजलगाव ।प्रतिनिधी

शहरा लगत असलेल्या मौजेखानापूर ग्रामपंचायत येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्रामपंचायत परिसरात महापुरुषांचे पूजन करून विधिवत ध्वजारोहण करण्यात आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिक व महापुरुषांना यावेळी अभिवादन करण्यात आले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून समाजभूषण तथा राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके व माजी उपसरपंच यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना खाऊ तसेच शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला प्रोत्साहन मिळावे आणि स्वातंत्र्य दिनाचा आनंद विद्यार्थ्यांसोबत साजरा करता यावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत शिक्षण, संस्कार आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रामाणिकपणे शिक्षण घेऊन जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे आजी-माजी सरपंच, सदस्य, शिक्षक, ग्रामसेवक शिंदे, प्रशासक तसेच ग्रामस्थ



मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुख्याध्यापक तुकाराम तांगडे, शिक्षक नागनाथ पडलवार, सरपंच पंडित आबुज, माजी सरपंच शंकर आबुज, उपसरपंच छगन क्षिरसागर, पोलीस पाटील महादेव कांबळे, माजी सदस्य रामभाऊ उदमले, माजी सदस्य गणेश मारगुडे, सदस्य बंडू आबुज, सदस्य परमेश्वर आबुज यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविण्यात आल्याने ग्रामस्थांकडून या उपक्रमाचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि स्वातंत्र्य दिनाचा उत्साह यामुळे खानापूर ग्रामपंचायत परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

# मयूर सार्वजनिक वाचनालयात गुणवंतांचा भव्य सत्कार संपन्न; विविध क्षेत्रांतील
## यशाचा गावकऱ्यांकडून गौरव

पाटोदा (प्रतिनिधी):

मयूर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शैक्षणिक, आरोग्य व कृषी क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करून गावाचा नावलौकिक वाढवणाऱ्या गुणवंतांचा भव्य सत्कार समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गावातील तरुणांना प्रेरणा मिळावी आणि त्यांच्या कष्टांची योग्य दखल घेतली जावी, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सत्कारमूर्तींचा गौरव

कार्यक्रमात नायगावचे भूमिपुत्र प्रा. डॉ. जावेद करीम शेख यांनी ग्रंथालय शास्त्र (डळ-लीरीू डलळशपलश) या विषयात सर्वोच्च शैक्षणिक मानली जाणारी 'पीएच.डी.' (डॉक्टरेट) पदवी संपादन केल्याबद्दल त्यांचा विशेष नागरी सत्कार करण्यात आला.

त्याचप्रमाणे, नागपूर येथे आरोग्य विभागात आरोग्य सेवक पदी निवड झाल्याबद्दल श्री. सोफियान (सोनू) पठाण व कृषी सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल श्री. बालाजी कवठेकर यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यास मयूर नगरीचे प्रथम नागरिक संदीप दादा कवठेकर, उपसरपंच बाबा भाई पठाण, माजी सरपंच तथा मयूर मित्र मंडळाचे अध्यक्ष शाहीद सय्यद सर, माजी उपसरपंच अशोक अण्णा सुपेकर, पोलीस पाटील साईनाथ



मोहळकर, ग्रामपंचायत सदस्य राहुल दादा वनवे, रवींद्र निकम, सोनू पठाण, इस्माईल पठाण, डॉ. शगीर पठाण, डॉ. साजिद पठाण, तय्यब पठाण, माजी ग्रामपंचायत सदस्य अशोक दादा मोहळकर, सेवा सोसायटीचे सचिव पवन भोसले, गोपीचंद औटे, आकाश मोहळकर, प्रेमचंद खेडकर, अमोल वाघुले, युवा नेते सुरज बांदल, प्रदीप वणवे, जमील पठाण, बाबू नामदार, समीर पठाण, असलम पठाण, अतिक पठाण यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण व शासकीय सेवेमध्ये भरारी घेऊन गावाचे नाव उंचावले पाहिजे, असा सूर यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. मयूर सार्वजनिक वाचनालयाने गुणवंतांचा सन्मान करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केल्याबद्दल परिसरातील सर्व स्तरातून या उपक्रमाचे मनापासून कौतुक होत आहे.

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी विवाहपूर्व समुपदेशन गरजेचे

## विवाहपूर्व आरोग्य तपासणीसह 'मॅरेज एलिजिबिलिटी सर्टिफिकेट' बंधनकारक करण्याची डॉ. अरुण भस्मे यांची मागणी

टेंभुर्णी ।प्रतिनिधी

घटस्फोटाचे वाढते प्रमाण कमी करायचे असेल, तर विवाहपूर्व समुपदेशन अर्थात 'प्री-मॅरेज काउन्सेलिंग' गरजेचे आहे. विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा संबंध नसून दोन कुटुंबांना जोडणारा संस्कार आहे. त्यामुळे विवाहापूर्वी युवक-युवतींना परस्परांच्या अपेक्षा, जबाबदाऱ्या, स्वभाव तसेच कौटुंबिक जीवनाबाबत योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन होमिओपॅथी क्षेत्रातील ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय होमिओपॅथिक परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. अरुण भस्मे यांनी केले.



डॉ. अरुण भस्मे यांच्या वाढदिवसानिमित्त सीसीएमपी होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशन, सोलापूर आणि सोलापूर जिल्हा होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १६ ऑगस्ट रोजी टेंभुर्णी येथील हॉटेल रामायणा येथे 'मेगाहोमिओकॉन २०२६' या एकदिवसीय वैद्यकीय परिषद व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या परिषदेला सुमारे २५० होमिओपॅथिक डॉक्टरांची उपस्थिती होती.

चर्चासत्रात डॉ. अभय मुथा यांनी होमिओपॅथी आणि लैंगिक शास्त्र या विषयावर केलेल्या विवेचनाचा संदर्भ देत डॉ. भस्मे बोलत होते. ते म्हणाले की, वैवाहिक जीवनात निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांचे मूळ गैरसमज, अपेक्षांमधील विसंगती तसेच शारीरिक आणि मानसिक समस्यांमध्ये असू शकते. त्यामुळे विवाहापूर्वीच युवक-युवतींना योग्य समुपदेशन व आरोग्यविषयक मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.

विवाहपूर्व प्रमाणपत्र बंधनकारक करण्याची मागणी

सरकारने लग्नपत्रिकेत जन्मतारीख नमूद करणे जसे बंधनकारक केले आहे, त्याचप्रमाणे 'मॅरेज एलिजिबिलिटी सर्टिफिकेट' अर्थात विवाह पात्रता प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था बंधनकारक करावी, अशी मागणीही डॉ. भस्मे यांनी केली. विवाहापूर्वी अशा प्रकारची आरोग्यविषयक तपासणी झाल्यास मुला-मुलींच्या काही शारीरिक समस्या आधीच निदर्शनास येऊ शकतात आणि त्यावर योग्य वैद्यकीय मार्गदर्शन घेता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

एमएमसी नोंदणीसाठी महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

यावेळी डॉ. भस्मे यांनी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी) नोंदणीच्या प्रश्नासाठी दि. १८ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या महामोर्चात राज्यातील सर्व पात्र होमिओपॅथिक डॉक्टरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. आपल्या हक्काच्या नोंदणीच्या प्रश्नासाठी सर्वांनी एकजुटीने सहभागी होऊन आपली ताकद दाखवावी, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे शुभहस्ते डॉ. अरुण भस्मे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विलास हरपळे, डॉ. बाळासाहेब हरपळे, डॉ. योगेश बोबडे, डॉ. रश्मी दुबे आणि डॉ. पांडुरंग गायकवाड उपस्थित होते.

विविध जीवनगौरव पुरस्कारांनी डॉक्टरांचा सन्मान

'मेगाहोमिओकॉन २०२६'मध्ये होमिओपॅथी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉक्टरांचा विविध मान्यवरांच्या नावाने देण्यात येणाऱ्या जीवनगौरव पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला.

डॉ. सॅम्युअल हॅनिमन जीवनगौरव पुरस्कार डॉ. श्रीधर पाटील (सोलापूर), डॉ. प्रमोद पाटील (मोहोळ), डॉ. मृदुला तळेकर (पंढरपूर) आणि डॉ. विलास हरपळे (सोलापूर) यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. शरदचंद्र दत्तात्रेय गुणे जीवनगौरव पुरस्कार डॉ. कालिदास लिमकर (बार्शी), डॉ. रंगनाथ गोपाळ कवीश्वर जीवनगौरव पुरस्कार डॉ. शुभांगी देशमुख (माळशिरस), डॉ. डी. व्ही. निकम जीवनगौरव पुरस्कार डॉ. संगीता पाटील (पंढरपूर), तर डॉ. एल. आर. भोसले जीवनगौरव पुरस्कार डॉ. रेखा रिसवडकर (सोलापूर) यांना देण्यात आला.

तसेच डॉ. रामकृष्ण महादेव चिंचोळकर जीवनगौरव पुरस्कार डॉ. सोमेश्वर ठोंगले (माढा), डॉ. वामनराव बापुरावजी डहाने जीवनगौरव पुरस्कार डॉ. सुनील वराळे (सोलापूर), डॉ. मिलिंद राव जीवनगौरव पुरस्कार डॉ. क्षमा बकाल (बार्शी), डॉ. प्रफुल्ल विजयकर जीवनगौरव पुरस्कार डॉ. श्रीराम परदेशी (करमाळा), डॉ. व्ही. डी. नागवंशी जीवनगौरव पुरस्कार डॉ. जयंत करंदीकर (कुर्डुवाडी) आणि डॉ. संजीव मुजुमदार जीवनगौरव पुरस्कार डॉ. दत्तात्रेय चोपडे-पाटील (कोल्हापूर) यांना प्रदान करण्यात आला.

तज्ज्ञांचे विविध विषयांवर मार्गदर्शन

परिषदेत डॉ. आनंद देशमुख, डॉ. ज्ञानेश्वर पवार, डॉ. सुहास राऊत, डॉ. दयानंद पवार, डॉ. आण्णासाहेब पवार, डॉ. अभय मुथा आणि डॉ. सपना गांधी यांनी होमिओपॅथीच्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ. बाळकृष्ण गायकवाड (अध्यक्ष) आणि डॉ. संजय देशमुख (सचिव) होते. आयोजन समितीचे चेअरमन डॉ. अंकुश लोंढे, सचिव डॉ. अजित नाळे, खजिनदार डॉ. आण्णासाहेब पवार आणि युवा आघाडी प्रमुख डॉ. फैज सय्यद यांच्यासह डॉ. नितीन कुबेर व डॉ. योगेश घोगरे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

राज्य कार्यकारिणीतील डॉ. अमित भस्मे, डॉ. अजय तायडे पाटील, डॉ. निलेश चिकणे यांच्यासह राज्य सदस्य तसेच करमाळा, बार्शी, मोहोळ, पंढरपूर आणि सांगोला तालुक्यातील डॉक्टरांनी कार्यक्रमात सहभाग घेतला.


'मेगाहोमिओकॉन २०२६' हा कार्यक्रम होमिओपॅथिक डॉक्टरांसाठी ज्ञानवर्धक व्याख्याने, वैद्यकीय क्षेत्रातील विचारमंथन, गुणवंत डॉक्टरांचा सन्मान आणि संघटनात्मक एकजुटीचा संदेश देणारा ठरला. कार्यक्रमासाठी सुमन होमिओ फार्मसी, वेणेगाव यांचे विशेष सहकार्य लाभले.

# महाआरोग्य शिबिरातून भीमराव बांगर यांना मोफत
## शस्त्रक्रियेचा लाभ

बीड या ठिकाणी झाली मोफत शस्त्रक्रिया

पाटोदा ।प्रतिनिधी

आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पुढाकारातून ५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा लाभ आता गरजू रुग्णांना प्रत्यक्ष शस्त्रक्रिया व उपचारांच्या माध्यमातून मिळू लागला आहे. या शिबिरात हजारो रुग्णांनी तपासणी करून घेतली असून, त्यापैकी आवश्यक उपचार व शस्त्रक्रिया असलेल्या रुग्णांवर टप्प्याटप्प्याने मोफत उपचार सुरू झाले आहेत.



पाटोदा तालुक्यातील भीमराव धोंडीबा बांगर यांनी या महाआरोग्य शिबिरात नोंदणी केली होती. तपासणीनंतर त्यांना हर्नियाच्या शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान झाले. त्यानुसार बीड येथील यशवंतराव जाधव मेमोरेबल हॉस्पिटल ट्रस्ट येथे त्यांच्यावर डॉ. अभिषेक जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी यशस्वीपणे शस्त्रक्रिया केली.

महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून नोंदणीपासून पुढील उपचारापर्यंत योग्य मार्गदर्शन मिळाल्याने बांगर यांना मोठा दिलासा मिळाला. शस्त्रक्रिया मोफत झाल्याने तसेच रुग्णालयातील उपचार समाधानकारक झाल्याबद्दल बांगर कुटुंबीयांनी आमदार सुरेश आण्णा धस आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे मनापासून आभार मानले.महाआरोग्य शिबिरातून तपासणी, उपचार आणि आता गरजू रुग्णांच्या मोफत शस्त्रक्रियेला सुरुवात झाल्याने 'शिबिर केवळ तपासणीपुरते मर्यादित न राहता रुग्णांना प्रत्यक्ष उपचाराचा आधार देणारे ठरत आहे', अशी भावना रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांकडून व्यक्त होत आहे.

# जिजामाता नर्सिंग व फिजिओथेरपी कॉलेजमध्ये
## स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

माजलगाव ।प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व स्पर्धेत देशभक्तीचा जागर.जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग व जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण व राष्ट्रगीताने झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांसह प्रभावी भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी तरुण पिढीची जबाबदारी, सामाजिक जागरूकता, स्वातंत्र्यसैनिकांचे विचार आणि देशप्रेम यांसारख्या विविध विषयांवर प्रभावीपणे विचार मांडले. विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण भाषणांनी संपूर्ण सभागृह देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले.

वक्तृत्व स्पर्धेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. परीक्षकांनी उत्कृष्ट वक्त्यांची निवड केली. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

वक्तृत्व स्पर्धेतील विजेते

प्रथम क्रमांक : कुमारी कोमल भुतकर – ऋछच् खखख धशरी

द्वितीय क्रमांक : कुमारी आदिती जाधव – ऋछच् खखख धशरी

तृतीय क्रमांक : कुमारी पायल जगताप – इ.डल. छीींळपस, ५ींह डशाशीींशी



सर्व विजेत्या विद्यार्थिनींचे यावेळी अभिनंदन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना, नेतृत्वगुण तसेच सार्वजनिक व्यासपीठावर प्रभावीपणे विचार मांडण्याची क्षमता विकसित करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमास जिजामाता नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा. एन. विनोथ कुमार, जिजामाता फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉ. पॉल राज, नर्सिंग कॉलेजचे उपप्राचार्य प्रवीण कुमार, ऑफिस सुपरिटेंडंट वाघ सर, शिंदे सर, जगताप सर, सिरसाट सर, रासवे सर आणि इरफान पठाण सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुलकर्णी सर यांनी केले. यावेळी जिजामाता नर्सिंग कॉलेज तसेच जिजामाता फिजिओथेरपी कॉलेजमधील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# वाढदिवसानिमित्त अन्नदानाचा
## स्तुत्य सामाजिक उपक्रम

माजलगाव ।प्रतिनिधी

माजलगाव : आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेठ साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त मूकबधिर निवासी विद्यालय, माजलगाव येथे अन्नदानाचा स्तुत्य सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला.

वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सवापुरता मर्यादित न ठेवता समाजातील गरजू व विशेष विद्यार्थ्यांसोबत आनंद वाटून घेण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले. या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. वाढदिवसाच्या निमित्ताने गरजू घटकांची



सेवा करणे हीच खरी मानवसेवा आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या स्तुत्य सामाजिक उपक्रमाचे आयोजक अनिल राधे कांबळे यांनी पुढाकार घेतला. समाजहिताच्या विविध उपक्रमांतून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# १५ ऑगस्टला स्नेहसंवर्धन पुरस्काराचे वितरण
## तृप्ती स्वीटचे हरीशभाई खिलोशिया यांचा होणार सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी


विविध प्रांतांतील नागरिकांमध्ये बंधुभाव, स्नेह आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी कार्यरत असलेल्या आंतरभारती, आंबाजोगाईच्या वतीने दरवर्षी दिला जाणारा 'स्नेहसंवर्धन पुरस्कार' यंदा गुजरात राज्यातील राजकोट जिल्ह्यातील मोरंबी येथून अंबाजोगाई येथे येऊन स्थायिक झालेल्या तृप्ती स्वीट होमचे संचालक हरीशभाई खिलोशिया यांना प्रदान करण्यात येणार आहे.

स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आधार मल्टिस्टेट सभागृह, आंबाजोगाई येथे हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. परंपरेनुसार मागील वर्षीचे पुरस्कार विजेते डॉ. विवेकानंद राजमान्य यांच्या हस्ते व

### शहरातील अन्यप्रांतीयांची विशेष उपस्थिती








आंतरभारती आंबाजोगाईच्या अध्यक्ष प्रो डॉ शैलजा बरुरे यांच्या अध्यक्षते खाली पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

या सोहळ्यास आंतरभारतीचे राष्ट्रीय मार्गदर्शक अमर हबीब आणि आंतरभारती, पुणेच्या कार्याध्यक्ष सविता कुरुंदवाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

अन्य प्रांतीयांचे स्नेहमीलन

स्नेहसंवर्धन पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने अंबाजोगाईत वास्तव्यास असलेल्या विविध राज्यांतील बंधू-भगिनींचे स्नेहमीलन आयोजित करण्यात आले आहे. विविध संस्कृती, भाषा आणि परंपरांचा सन्मान करत राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा हा उपक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे.

या कार्यक्रमास अंबाजोगाईतील तसेच परिसरातील अन्य प्रांतीय नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष प्रा. शैलजा बरुरे, सचिव संतोष मोहिते व संयोजक व्यंकटेश जोशी, यांनी केले आहे.

हा आगळावेगळा उपक्रम सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा ठरणार असून, अंबाजोगाईतील सुजाण नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# शांतिनिकेतन विद्यामंदिरमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

जालना शेख फारुक :- शहरातील संभाजीनगर प्रभागातील समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शांतिनिकेतन विद्यामंदिरमध्ये भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

माजी सैनिक एकनाथराव हंडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी संस्थेचे संचालक हरिहर शिंदे, नगरसेवक अश्विन अंबेकर, नंदकुमार जाधव,प्रा.राम कदम,किसनराव राठोड, जगदीश अग्रवाल,कविता अग्रवाल,पांडुरंग काळे, जीवन खंडागळे,मुख्याध्यापक ज्ञानेश्वर गाढवे,प्रेमला पंडित व प्रा.विजय राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरणप्रभावी भाषणे तसेच विविध शारीरिक कवायती सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे शाळेचा परिसर देशभक्तीच्या जयघोषाने दुमदुमून गेला.

दरम्यान, स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धा तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक तसेच विविध उपक्रमांत मिळविलेल्या यशाचे उपस्थितांनी कौतुक केले.

कार्यक्रमास शांतिनिकेतन विद्यामंदिरच्या प्राथमिक, माध्यमिक व नर्सिंग विभागातील शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या




यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात शासकीय कार्यालयांसह शाळा-महाविद्यालयात राष्ट्रध्वजाला मानवंदना

भोकरदन इसरारखान पठाण

स्वातंत्र्य हा केवळ उत्सवाचा दिवस नसून ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे या भावनेने भोकरदन तालुका १५ ऑगस्ट रोजी देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाला. देशाच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त उपविभागीय अधिकारी कार्यालयात मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा सोहळा उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. उपविभागीय अधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला.यावेळी पोलीस पथकाने राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली तर राष्ट्रगीताच्या स्वरांनी परिसर भारावून गेला.

मुख्य कार्यक्रमाच्या निमित्ताने तहसील कार्यालय पंचायत समिती, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय पोलीस ठाणे नगरपरिषद गटशिक्षणाधिकारी कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय महावितरण सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग,जलसंधारण भूमी अभिलेख,कृषी विभाग, ग्रामीण रुग्णालय तसेच जिल्हा परिषद व खासगी शाळांमध्येही उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले.

एसडीएम कार्यालयात शासकीय इतमामात सोहळा

भोकरदन उपविभागाचे प्रशासकीय केंद्र असलेल्या उपविभागीय अधिकारी कार्यालयात झालेल्या मुख्य कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी,कर्मचारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपविभागीय अधिकाऱ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व अधोरेखित करताना शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी,पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग यावर भर दिला.सुशासन हेच स्वातंत्र्याचे खरे फलित असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

महसूल ते ग्रामीण विकास विभागात उत्साह

तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. यावेळी विभागप्रमुख, कर्मचारी व



ग्रामसेवक उपस्थित होते.ग्रामीण विकासाच्या विविध योजनांची माहिती देत गावपातळीवर विकासाला गती देण्याचा निर्धार करण्यात आला.

उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात ध्वजारोहणानंतर पोलीस पथकाच्या संचलनाने वातावरणात देशभक्तीची ऊर्जा निर्माण झाली. भोकरदन पोलीस ठाण्यातही पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासोबतच देशसेवेसाठी सदैव तत्पर राहण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

नगरपरिषदेसह विविध कार्यालयांत झेंडावंदन

नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्ष यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.नगरसेवक, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात आरोग्य कर्मचाऱ्यांसह आशा सेविकांनी सहभाग घेतला. महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग,वन विभाग, जलसंधारण,भूमी अभिलेख, कृषी विभाग आणि ग्रामीण रुग्णालयातही संबंधित अधिकाऱ्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

वन विभागाच्या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धन व वृक्षारोपणाचा संदेश देण्यात आला तर जलसंधारण विभागाने जलसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दर्जेदार रस्ते व पायाभूत सुविधांसाठी प्रयत्न करण्याचा संकल्प करण्यात आला.शाळांमध्ये देशभक्तीचा जल्लोष जिल्हा परिषद शाळा, भोकरदन न्यू हायस्कूलसह विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते,भाषणे,नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास संविधानिक मूल्ये आणि नागरिकांची कर्तव्ये यांची माहिती दिली.

सकाळपासूनच शहरातील वातावरण भारत माता की जय आणि वंदे मातरम् च्या घोषणांनी दुमदुमून गेले होते. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांच्या हातात तिरंगा दिसत होता. स्वच्छता,पर्यावरण संवर्धन, जलसंवर्धन,व्यसनमुक्ती आणि डिजिटल साक्षरतेचा संदेशही विविध कार्यक्रमांतून देण्यात आला.भोकरदनने स्वातंत्र्य दिन साजरा नाही तर जगला एसडीएम कार्यालयातील मुख्य कार्यक्रमापासून ते पंचायत समिती पोलीस विभाग, नगरपरिषद,महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि शैक्षणिक संस्थांपर्यंत सर्वत्र दिसून आलेला उत्साह विशेष लक्षवेधी ठरला. सरकारी यंत्रणा आणि जनता एकत्र आली की राष्ट्रनिर्मितीची ताकद अधिक बळकट होते अशी भावना एका ज्येष्ठ नागरिकाने व्यक्त केली.

यंदाचा स्वातंत्र्य दिन भोकरदनसाठी केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता शिस्त,देशभक्ती आणि नागरिकांच्या सहभागाचा उत्सव ठरला.उपविभागीय अधिकारी कार्यालयातील मुख्य ध्वजारोहणापासून गावागावातील शाळांपर्यंत तिरंग्याच्या साक्षीने संपूर्ण भोकरदन तालुका राष्ट्रप्रेमाने भारावून गेला.

# मोदी लर्निंग सेंटर येथे ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

### विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर भाषणे, गीते व विविध सांस्कृतिक सादरीकरणातून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मोदी लर्निंग सेंटर येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साह, देशभक्ती आणि अभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रध्वजारोहणाने झाली. न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य डॉ.पांडुरंग के.पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताचे गायन केले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीते व विविध सांस्कृतिक सादरीकरणातून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. विद्यार्थ्यांच्या निरागस आणि



ओजस्वी भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली. संस्थाध्यक्ष राजकिशोर मोदी, व्यवस्थापकीय संचालक संकेत मोदी, कार्यकारी संचालिका सौ.डिंपल मोदी, मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी, माजी उपप्राचार्य वसंतराव चव्हाण, प्राचार्य विनायक मुंजे, प्रा.राघवेंद्र राजमान्य, मुख्याध्यापक प्रदीप सोनी, समन्वयक रवींद्र राजगुरू, त्रिपाठी जयशंकर, शारदा शिंदे, नितीन घोबाळे, शिल्पा शिंदे, स्नेहल पाटील, सांस्कृतिक विभाग समन्वयक सुचिता दहिफळे तसेच परिपाठ प्रमुख केतेश्वरण यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमास श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत डी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके, प्राचार्य नरेश जयस्वाल, कॉक्सिट महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती तपस्या गुप्ता, श्री जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य चंद्रकांत गायकवाड तसेच संस्थेच्या विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन परिपाठ प्रमुख केतेश्वरण, सांस्कृतिक विभाग समन्वयक सुचिता दहिफळे व शिक्षकवृंद यांनी केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध देशभक्तीपर कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात उत्साह आणि राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. 'एकता, शिस्त आणि राष्ट्रप्रेम' या मूल्यांचा संदेश देत स्वातंत्र्य दिनाचा हा सोहळा उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.

# व्यक्तीस्वातंत्र्य धर्मनिरपेक्ष मूल्यांमुळेच देशाचे स्वातंत्र्य अबाधित राहील- राजेश टोपे

जालना शेख फारुक :- भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेले व्यक्तीस्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्ष मूल्यांचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.या मूल्यांमुळेच देशाचे स्वातंत्र्य अधिक बळकट आणि अबाधित राहील असे प्रतिपादन मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आरोग्यमंत्री राजेशभैय्या टोपे यांनी केले.अंकुशराव टोपे महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी आयोजित मुख्य ध्वजारोहण समारंभ राजेश टोपे यांच्या हस्ते पार पडला.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी मार्गदर्शन करताना राजेश टोपे म्हणाले की आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ पारंपरिक शिक्षणावर अवलंबून न राहता तंत्रज्ञानाची सांगड घालणे गरजेचे आहे.बदलत्या काळातील




आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी नवनवीन कौशल्ये आत्मसात करून स्वतःला सक्षम बनवावे असे आवाहन त्यांनी केले.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पर्यावरण निर्झर इतिहास दर्पण आणि अर्थनीती या प्रकाशनांचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तसेच भाषा व वाडमय सामाजिक शास्त्रे,विज्ञान आणि वाणिज्य विभागाच्या विविध उपक्रमांचेही अनावरण करण्यात आले.विविध क्रीडा प्रकारांत विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या खेळाडूंचा यावेळी सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ.बी.आर. गायकवाड,माजी प्राचार्य डॉ. आर.जे.गायकवाड, अजिंक्यदादा टोपे,प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील, उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे, क्रीडा संचालक डॉ.भुजंगराव डावकर,पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर,ग्रंथपाल डॉ. तुकाराम गजर आणि कार्यालयीन अधीक्षक सुरेश ठेंग यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. टी.वाय.शेख,शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अलका मंडलिक,अशोक आघाव,दिगंबर घोगरे,अजिंक्य गायकवाड यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भगवान सेवा मंडळ व वंजारी समाज बांधवांच्या वतीने ड.संजय काळबांडे, भाऊसाहेब घुगे यांचा भव्य सत्कार

जालना शेख फारुक :- भगवान सेवा मंडळ जालना तसेच वंजारी समाजबांधवांच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नवनियुक्त जालना जिल्हाध्यक्ष ड.संजयजी काळबांडे आणि शिवसेना जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

ड.संजयजी काळबांडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जालना जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल तर भाऊसाहेब घुगे यांना लोकशाही चॅनलतर्फे जलक्रांती पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळ जालना यांचे अध्यक्ष राजेंद्र राख यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.मालेगावचे तहसीलदार संदीपराव ढाकणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात विभागीय अध्यक्ष आश्रमशाळा संघटनेचे संदीप हुसे सर आणि जगद घुगे यांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी भाऊसाहेब घुगे,ड.संजयजी काळबांडे, संदीप हुसे आणि जगद घुगे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.सामाजिक कार्य समाजहिताचे उपक्रम आणि समाजाच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे



आवाहन यावेळी करण्यात आले.दिवंगतांच्या स्मृतींना अभिवादन कार्यक्रमादरम्यान जालना जिल्ह्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या दिवंगत कल्पना दादाराव वाघ माळेगाव, सुखदेव बापूराव सहारे वंजार उंब्रद,चित्रकार श्रीधर अंभोरे आणि माजी नगराध्यक्ष चंपालाल भगत यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचे स्मरण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी दीपक दराडे,बळीराम गीते डीवायएसपी,मधुकर सोनवणे,रवींद्र हुसे, वास्तुविशारद जगदीश नागरे, प्रकाश जायभाय,ओमप्रभु नागरे,मुरली काकडे,योगेश नागरे,नेहरकर,शिवाजी वाघ, भगवानराव गीते,राजू ढाकणे आणि महादू गीते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देवेंद्रजी बारगजे यांनी केले तर ड.वाल्मीक घुगे यांनी आभार मानले.सामाजिक शैक्षणिक आणि जलसंधारण क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव आणि समाजबांधवांमधील स्नेहभाव अधोरेखित करणारा हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.



## दावरवाडी येथे ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा...!

दावरवाडी ।प्रतिनिधी

दावरवाडी येथे १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध ठिकाणी ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.यामध्ये न्यू हायस्कूल व उच्च माध्यमिक विद्यालय, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, विविध कार्यकारी विकास सोसायटी दावरवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, पशुवैद्यकीय दवाखाना तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी ध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत म्हणण्यात आले. या कार्यक्रमास गावातील नागरिक, अधिकारी, पदाधिकारी, शाळेतील मुख्याध्यापक ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य चेअरमन व्हाईस चेअरमन सोसायटी कर्मचारी शिक्षक व शिक्षकेतर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.देशभक्तीपर वातावरणात संपूर्ण गावात स्वातंत्र्य दिनाचा उत्साह पाहायला मिळाला.

## विक्रमशिला शाळेत स्वातंत्र्य दिनाचा उत्साह विद्यार्थ्यांच्या पी.टी.प्रात्यक्षिकाने वेधले लक्ष

अंबड ।प्रतिनिधी

शहरातील विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन देशभक्तीमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शनामुळे कार्यक्रमस्थळी राष्ट्रप्रेमाची भावना जागृत झाली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने झाली.माजी नगराध्यक्ष तथा उद्योजक काकासाहेब कटारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थितांनी राष्ट्रगीताने अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मच्छिंद्र राठोड होते.संस्थेचे संचालक संजय जाधव,माजी नगराध्यक्ष तथा उद्योजक काकासाहेब कटारे,पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर साळुंके,महाराष्ट्र सर्वांचे चे कार्यकारी संपादक हरिभाऊ गिराम,म्युच्युअल फंड सल्लागार अतिश बिडकर आणि वनिता ग्रो कंपनी,जालना येथील सेल्स ऑफिसर नितीन चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिक्षक योगेश हरणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व जोशपूर्ण पी.टी.चे प्रात्यक्षिक सादर केले.



त्यांच्या या सादरीकरणाला उपस्थित मान्यवर पालक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली.यावेळी शिवराज सोमासे,युवराज पुसावळे, पार्थ जमधडे आणि विश्वास पोटे यांनी स्वातंत्र्याचे महत्त्व, देशभक्ती आणि राष्ट्रनिर्मिती या विषयांवर प्रभावी भाषणे केली.अमन शेख आणि ऋषिकेश उगले यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी कार्यक्रमस्थळी उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगेश हरणे, संजय जाधव,अजय गाढेकर, प्रशांत पारगावकर आणि शितल जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.यावेळी शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशभक्ती,शिस्त आणि संस्कारांचा संदेश

विद्यार्थ्यांच्या पी.टी. प्रात्यक्षिकांसह भाषणे व देशभक्तीपर गीतांमधून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित झाला.देशभक्ती, शिस्त,संस्कार आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा सुंदर मिलाफ घडवत विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेचा स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात संपन्न झाला.

### शेकडो श्वानांच्या संशयास्पद मृत्यूला न्याय मिळवून देण्यासाठी

## काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांचा श्वानांसह आगळा-वेगळा आमरण उपोषण

अंबाजोगाई (प्रतिनिधी )

अंबाजोगाई शहरात गेल्या काही महिन्यात झालेल्या शेकडो श्वानांच्या संशयास्पद मृत्यूला न्याय मिळावा यासाठी काँग्रेसचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी आगळा-वेगळा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. ते थेट श्वानांना सोबत घेऊन आमरण उपोषणाला बसले आहेत. आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस असून नगरपरिषदेतील श्वान नसबंदी घोटाळा, टेंडरमधील भ्रष्टाचार आणि दिशाभूल करणाऱ्या अहवालाविरोधात हे उपोषण असून श्वानप्रेमी मोठ्या प्रमाणात आपापले श्वान घेऊन उपोषण स्थळी दाखल होत मागण्यास पाठिंबा देत आहेत.

यासोबतच लोमटे यांनी मराठा समाजाच्या मुलींसाठी वस्तीगृह आणि मराठा भवन जागेसाठी या मागणीसाठी देखील आवाज उठवला आहे. यशवंतराव चव्हाण चौक नजीक असलेल्या शासकीय जागेत मराठा भवन व्हावे अशी आग्रही मागणी आहे. मात्र प्रशासन जाणीवपूर्वक



शहराबाहेर जागा दाखवून मराठा समाजाची दिशाभूल करत आहे असा आरोप त्यांनी केला.

जयवंती नदीतील अतिक्रमण आणि मोंढा परिसरातील पुरातन विहीर याबाबत पुरातत्व विभाग व जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असूनही नगरपरिषद प्रशासन चालढकल करत आहे. विशेष म्हणजे अंबाजोगाईतील भाजप आणि राष्ट्रवादी पक्षाच्या काही नेत्यांचे सदरील अतिक्रमण असून केजच्या आमदार व नगराध्यक्षांचे राजकीय वरदहस्त या अतिक्रमणामागे असल्याचा गंभीर आरोप अभिजीत लोमटे यांनी केला आहे. नगर परिषदेचे शिष्टमंडळ पहिल्या दिवशी दोनदा उपोषणकर्ते अभिजीत लोमटे यांची भेट घेतली मात्र होस कारवाई न झाल्याने उपोषणकर्ते व शिष्ट मंडळातील चर्चा फिसकली

एकिकडे श्वान मरत आहेत, दुसरीकडे नदी आणि विहीर बुजवली जात आहे. तिसरीकडे मराठा समाजाला हक्काची जागा नाकारली जात आहे. आणि चौथीकडे राजकीय नेत्यांची अतिक्रमणे जतन केली जात आहेत. हा सगळा प्रकार म्हणजे अंबाजोगाईच्या अस्मितेवर घाला आहे. जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही माघार घेणार नाही असे अभिजीत लोमटे म्हणाले.काँग्रेस पक्षाच्या या आंदोलनास माजी आमदार पृथ्वीराज साठे, अंबाजोगाई तालुका मराठा सेवक टीम, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष , रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचा, नगरसेवक बबन भैय्या लोमटे, पत्रकार संघटना, गित्ता मा. सरपंच अनिल शिंदे, सरपंच सुनील देशमुख, रिपब्लिकन बहुजन सेना, युवा भीमसेना, अखिल भारतीय छावा संघटना, ऑल इंडिया पँथर सेना, सामाजिक कार्यकर्ते भीमसेन लोमटे,अंबाजोगाईतील युवक वर्ग, जेष्ठ नागरिक तसेच अंबाजोगाईतील श्वानप्रेमींनि जाहीर पाठिंबा दर्शवला.

## बारसवाड्यात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

बारसवाडा प्रतिनिधी :- अंबड तालुक्यातील मौजे बारसवाडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिन उत्साहपूर्ण आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. हातात तिरंगा ध्वज घेतलेल्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या घोषणा देत गावातून प्रभात फेरी काढली.

प्रभात फेरी ग्रामपंचायत कार्यालयात पोहोचल्यानंतर सरपंच रामेश्वर खंडागळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर प्रभात फेरी शाळेच्या परिसरात आल्यानंतर शालेय समितीचे अध्यक्ष अनिल गायकवाड यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.यावेळी विद्यार्थ्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांच्या कार्याची माहिती देत प्रेरणादायी मनोगते व्यक्त केली. सरपंच रामेश्वर खंडागळे, उपसरपंच गजानन सावंत, शालेय समितीचे उपाध्यक्ष गजानन




मिठे ,चेअरमन अर्जुन गायकवाड,ग्रामपंचायत सदस्य बद्रीआबा गायकवाड, जगन्नाथ मारकळी,तंटामुक्ती अध्यक्ष सुभाष मिठे, आबासाहेब शिंदे,दत्तात्रेय मिठे,माजी सरपंच किसन तात्या गायकवाड यांनीही स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व विशद केले.डॉ.शुभम मिठे यांनी क्रांतिकारकांच्या त्यागाची आठवण करून देत विद्यार्थ्यांना देशप्रेम आणि राष्ट्रनिष्ठेची प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.यावेळी साक्षरतेविषयी सामूहिक शपथ घेण्यात आली.वंदे मातरम् च्या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वनवे सर यांनी केले.अनुबोधन अनुबोधन सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सावंत सर यांनी मानले.कार्यक्रमास गावातील पालक,विद्यार्थी, तरुण तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण कार्यक्रमाला उत्साहाचे आणि देशभक्तीचे वातावरण लाभले.

## मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेच्या पाठपुराव्याला यश

ऊसतोड कामगारांसाठी ऊसमित्र पचा शुभारंभ

जालना शेख फारुक :-दि.१५ ऊसतोड कामगारांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ आणि जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांच्या पुढाकारातून जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांसाठी ऊसमित्र प सुरू करण्यात आले. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या उपस्थितीत या पचा शुभारंभ करण्यात आला.

ऊसतोड कामगारांचे हंगामी स्थलांतर आरोग्याच्या समस्या मुलांचे शिक्षण सामाजिक सुरक्षा विमा तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ घेताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन हे डिजिटल व्यासपीठ विकसित करण्यात आले आहे. या पच्या माध्यमातून कामगारांना विविध शासकीय योजना व कल्याणकारी सेवांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

या उपक्रमाचा शुभारंभ पालकमंत्री पंकजाताई मुंडे, खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार नारायणराव कुचे, आमदार अर्जुनराव खोतकर, जिल्हाधिकारी अशिमा मित्तल तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष राहुलभैय्या लोणीकर यांच्या



उपस्थितीत करण्यात आला.

ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी अनेकदा कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. स्थलांतरामुळे कागदपत्रे आरोग्यसेवा शिक्षण आणि सामाजिक सुरक्षा योजनांशी जोडले जाण्यातही अडथळे निर्माण होतात. या पार्श्वभूमीवर ऊसमित्र प कामगारांसाठी उपयुक्त डिजिटल दुवा ठरण्याची अपेक्षा आहे.

मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेने ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांना शासन आणि प्रशासनाच्या स्तरावर सातत्याने मांडून या उपक्रमासाठी पाठपुरावा केला. त्यातूनच हा उपक्रम प्रत्यक्षात आला असून जालना जिल्ह्यातील हजारो ऊसतोड कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना याचा फायदा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जेईएस महाविद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात ५०० एनसीसी कॅडेट्सचे दिमाखदार संचलन

प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते ध्वजारोहण कॅप्टन डॉ.मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली कॅडेट्सची दमदार कामगिरी

जालना शेख फारुक

जालना एज्युकेशन सोसायटीच्या आर.जी. बगडिया आर्ट्स एस.बी. लखोटिया कॉमर्स आणि आर. बेझंजी सायन्स महाविद्यालयात ८०वा स्वातंत्र्य दिन शनिवारी दि. १५ मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वज फडकताच उपस्थितांनी राष्ट्रगीताद्वारे तिरंग्याला मानवंदना दिली.



स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्सचे शिस्तबद्ध संचलन विशेष आकर्षण ठरले.सुमारे २०० विद्यार्थीनी आणि ३०० विद्यार्थी अशा तब्बल ५०० एनसीसी कॅडेट्सनी संचलनात सहभाग घेतला. तालबद्ध पावले अचूक हालचाली आणि आत्मविश्वासपूर्ण संचलनाने कॅडेट्सनी उपस्थितांची मने जिंकली.या शानदार संचलनामागे कॅडेट्सची अनेक दिवसांची मेहनत होती. दररोज पहाटे ४.३० वाजता प्रशिक्षणाला सुरुवात करून सकाळी ७ वाजेपर्यंत कठोर सराव करण्यात आला.कॅप्टन डॉ.मोहिते एफ.एम.यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या सरावाचा परिणाम स्वातंत्र्य दिनाच्या संचलनातून प्रकर्षाने जाणवला.एनसीसी च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ शारीरिक प्रशिक्षणच नव्हे तर शिस्त,नेतृत्व,आत्मविश्वास, राष्ट्रप्रेम आणि सामाजिक बांधिलकीचे धडे दिले जात आहेत.स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने कॅडेट्सनी सादर केलेल्या संचलनातून या प्रशिक्षणाची प्रचिती आली.विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सहभागामुळे स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाला विशेष भव्यता प्राप्त झाली. ध्वजारोहण राष्ट्रगीत आणि एनसीसी कॅडेट्सच्या दमदार संचलनाने जेईएस महाविद्यालयाचा स्वातंत्र्य दिनाचा सोहळा उत्साह शिस्त आणि देशभक्तीच्या वातावरणात दिमाखात पार पडला.



## रोटरीने केला गुणवंतांचा सत्कार

अंबाजोगाई (प्रतिनिधी )

येथील रोटरीक्लबच्या वतीने नीट परीक्षेतील गुणवंत विदयार्थी व पालकांचा सत्कार केला . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्लबचे अध्यक्ष शेख शकील होते . याप्रसंगी सचिव राधेशाम लोहिया , प्रा . रोहिनी पाठक, डॉ . नवनाथ घुगे यांची विशेष उपस्थिती होती .या प्रसंगी नीट परीक्षेत यशस्वी झालेले गुणवंत राजवीर श्रीनिवास रेड्डी, रणवीर नाथ रेड्डी, अनवी दिलीप गायकवाड,अर्णवी सचिन पोतदार यांचा पालकांसह सत्कार करण्यात आला .संतोष मोहिते यांनी नियोजित सामाजिक उपक्रमाची माहिती दिली . दीव दमन अधिवेशनाची माहिती कल्याण काळे व धनराज सोळंकी यांनी दिली . शेख मोईन यांनी शहरातील चौकाचे सुशोभिकरण करण्याचे अवाहन केले . डॉ सचिन पोतदार यांनी आरोग्य शिबीर घेण्याचे जाहीर केले .आगामी काळात वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा निश्चय क्लबचे अध्यक्ष शकील शेख यांनी व्यक्त केला . कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रूपेश रामावत यांनी केले . शेवटी राधेशाम लोहिया यांनी सर्वांचे आभार मानले

## गेवराईत स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी विधी सेवा समितीतर्फे वॉकथॉन रॅलीचे आयोजन करण्यात आले

माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीडचे अध्यक्ष श्री. दिनेश पी.सुराणा साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्यदिनानिमित्त गेवराई येथे तालुका विधी सेवा समिती, गेवराई आणि गेवराई वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्ट रोजी वॉकथॉन जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आले होते. सकाळी आठ वाजता ध्वजारोहण झाल्यानंतर या रॅलीचे आयोजन करण्यात आले. सदर रॅलीस मा. न्यायिक अधिकारी, गेवराई वकील संघातील सन्माननीय विधीज्ञ, न्यायालयीन कर्मचारी, तसेच शालेय विद्यार्थी व शिक्षक यांनी सहभाग नोंदवला.

या वॉकथॉनच्या माध्यमातून बालमजुरी प्रतिबंध, वेठबिगार मजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण,शिक्षणाचा अधिकार यांसह



विविध कायदेविषयक बाबींवर नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आले.

कायद्याची माहिती समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे तसेच नागरिकांमध्ये त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सामाजिक आणि कायदेविषयक जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी सदर रॅली काढण्यात आली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# तालमृदंग पखावज गुरुकुलाचा गुरु अभिवादन सोहळा व गुणगौरव सोहळा संपन्न

अंबाजोगाई-प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात पूस येथे तालमृदंग पखावज गुरुकुल तर्फे काही दिवसांपूर्वी झालेल्या गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने रविवार दिनांक ०२-०८-२०२६ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत रेणुकाचार्य मंदिर मठ संस्थान पुस येथे मठाच्या सभागृहात गुरु अभिवादन सोहळा हा संगीत महोत्सव आणि गुणगौरव सोहळा खूप थाटामाटात पार पडला. या सोहळ्यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जगविख्यात पखवाज वादक तालमणी पंडित उद्धव बापू आपेगावकर ( पद्मश्री पंडित शंकर बापू आपेगावकर यांचे शिष्य ) तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून प्रा.श्री शशिकांतजी देशमुख सर ( अध्यक्ष कला विषय समिती महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ बालभारती पुणे) , गुरुवर्य पंडित महाराज गिरी बडवणीकर ( अध्यक्ष - सोमेश्वर संगीत व आध्यात्मिक सेवाभावी संस्था घाटनांदुर ) व कार्यक्रमासाठी लाभलेले प्रमुख पाहुणे म्हणून ह.भ.प. बाळासाहेब महाराज लटपटे ( मातोश्री चंद्रभागा आश्रम -परळी) , ह.भ.प. जनार्धन स्वामी चलवाड ( श्रीक्षेत्र पावन धाम संस्थान ) , श्री. दिलीपजी अडसूळ सर (पुण्यनगरी चे संपादक ) पुस गावचे प्रथम नागरिक सरपंच श्री. श्रीराम बापू पवार साहेब ,



माजी सरपंच श्री. वसंतरावजी देशमुख साहेब , शि.भ.प. बस्वराज स्वामी गणाचार्य ( मठाधीपती- रेणुकाचार्य मंदिर मठ संस्थान पुस ) ह.भ.प. गोविंद महाराज मुंडे ( अध्यक्ष- कन्हैया आध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्था परळी वै.) हे सर्व मान्यवर उपस्थित होते .या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह.भ.प.श्री. अमर महाराज एकलारे यांनी केले .

कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलन व सरस्वती वंदनेने झाली . त्यानंतर मान्यवरांचे सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.मान्यवरांनी तालमृदंग पखवाज गुरुकुल चे संस्थापक श्री बंकटकुमार बैरागी यांचेही अनेक विद्यार्थी घडवल्यामुळे स्वागत केले .

त्यानंतर विद्यार्थ्यांचा गुणगौरव पार पडला त्यामध्ये अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ मुंबई या विद्यापीठाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय लेव्हलच्या स्पर्धेमध्ये श्री. नामदेव महाराज फड यांचा भारतातून दुसरा क्रमांक आणि चि. ओमकार ढाकणे याचा चतुर्थ क्रमांक आल्यामुळे मान्यवरांच्या हस्ते यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. व त्यानंतर

प्रमुख पाहुण्यांनी, गुरुवर्यांनी विद्यार्थ्यांना पखावज वादनाच्या रियाजाविषयी, शास्त्रीय पखावज वादन शिकण्याविषयी, लय-लयकारी शिकण्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. गुरूंच्या हातून अवगत केलेल्या कलेचा / विद्येचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला पाहिजे म्हणून गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुकुलात विद्यार्थ्यांचा गुणगौरव पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात गुरुकुलचा विद्यार्थी चि.करण मुंडे व चि.ओमकार ढाकणे यांनी पखावजावर वाजवल्या जाणाऱ्या धमारतालाने झाली. उत्तम प्रकारे सादरीकरण केल्यामुळे वादनासाठी मान्यवरांच्या हस्ते बहुमोलाची दाद आणि शुभ आशिर्वाद मिळाले. तद्नंतर मृदंगमहर्षी पं. ज्ञानोबा माऊली लटपटे महाराजांचे शिष्य श्री नामदेव महाराज फड उखळीकर यांनी पखावजावर वसंतताल सादर केला मान्यवरांची दाद मिळवली व त्यानंतर गुरुकुलातील अनेक विद्यार्थ्यांचे मृदंग वादन उत्तम प्रकारे सादरीकरण झाले, विद्यार्थ्यांनी पखावजावर ताल- चौताल, आदिताल , राम कृष्ण हरी भजन साखळी, ज्ञानोबा तुकाराम भजन साखळी , अशाप्रकारे सादरीकरण केले. गुरुकुलातील अशा ४० ते ५० विद्यार्थ्यांनी आपले सादरीकरण केले.यांना लेहरा/नग्म्याची साथसंगत चि. ऋषिकेश होळंबे यांनी केली.

या कार्यक्रमासाठी अतिथी कलावंत म्हणून लाभलेले संगीत अलंकार प्रा. प्रसाद दादा कुलकर्णी (पं. शिवदासजी देगलूरकर गुरुजी यांचे शिष्य) यांनीही उत्कृष्ट अभंगवाणी सादर केली.त्यांना साथ-संगत संवादिनी- सं.अ. प्रा. शैलेशजी पुराणिक सर बासरी- श्री. भागवतजी पाठक सरतबला - प्रा. श्री रत्नदीपजी शिगे सर, श्री. दत्तात्रय म. पुरी पखवाज:- तालमृदंग पखवाज गुरुकुल चे संस्थापक मृ.अ. श्री बंकटकुमार बैरागी यांनी केली.

तालमृदंग पखावज गुरुकुल चे संस्थापक अध्यक्ष मृ.अ.श्री.बंकटकुमार बैरागी यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी व सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन हा गुरु अभिवादन सोहळा व गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात पार पाडला.

# शिरीषभाऊ थोरवे,राजेंद्र थोरवे यांना मातृशोक

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा प्रहार संघटनेचे नेते शिरीषभाऊ थोरवे आणि राजेंद्र थोरवे यांच्या मातोश्री भगीरथी शिवराम थोरवे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने थोरवे कुटुंबावर तसेच सोलापूरवाडी व परिसरात शोककळा पसरली आहे.



भगीरथीबाई थोरवे या प्रेमळ, कुटुंबवत्सल आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांनी आपल्या कुटुंबाला प्रेम, संस्कार आणि माणुसकीची शिकवण देत कुटुंबाला एकत्रित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या निधनाने थोरवे कुटुंबाने आपल्या कुटुंबातील प्रेमळ आणि आधारवड व्यक्तिमत्त्व गमावले आहे.

त्यांच्यावर आष्टी तालुक्यातील धानोरा येथील वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांसह नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भगीरथी शिवराम थोरवे यांच्या पश्चात सामाजिक कार्यकर्ते शिरीष थोरवे व राजेंद्र थोरवे हे दोन मुले, सौ. छबुताई पठाडे व श्रीमती जयश्री चौधरी या दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.अंत्यविधीस आ. सुरेश धस, माजी आ. साहेबराव दरेकर, चंद्रकांतभाऊ आजबे, अभय धोंडे, हनुमंत थोरवे, सौ. प्राजक्ताताई धस, जे. आर. पवार, माऊली जरांगे, माजी सभापती विजयकुमार बांदल, धैर्यशील थोरवे, सुदाम काका झिंजुर्के, परमेश्वरकाका शेळके, कांतीलाल चानोदिया, शिवाजी मोरे, माजी सभापती अंकुश चव्हाण, नवनाथ पठाडे, बाळासाहेब थोरवे, तानाजी जंजिरे, शिवाजी वाडेकर, प्रा. झांजे सर, राजाभाऊ शेळके, डॉ. शहाजी निंबोरे, सेवानिवृत्त उपअभियंता रमेश ढोबळे, चांगदेव एकशिंगे मेजर, सय्यद अब्दुलभाई अध्यक्ष, नामदेव शेळके, राजेंद्र दहातोंडे, अशोक लगड, अशोक घोडके, पी. ई. तळेकर, बाळासाहेब शेंदुरकर, प्रफुल्ल सहस्रबुद्धे, उत्तम बोडखे, अनिल लगड, आप्पा वाडेकर, ह.भ.प. गायकवाड महाराज, इंद्रजीत शेंदुरकर, बाबू चव्हाण, प्राचार्य रविकांत सूबरे, अनिल सूबरे, रावसाहेब भस्मे, सतीश दळवी, भरत जाधव, हनुमंत जाधव, हनुमंत गावडे, हौसराव एकशिंगे, टकले सर, महादेव मुंगसे, पांडुरंग जंजिरे यांच्यासह सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी थोरवे कुटुंबीयांचे सांत्वन करून दिवंगत भगीरथीबाई थोरवे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या निधनाने कुटुंबीयांनी गमावलेली मायेची सावली आणि परिसराने गमावलेले प्रेमळ व्यक्तिमत्त्व यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# संतविचारांचे आचरण करण्यातच खरे सुख-ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील आनंदवाडी-सराटेवडगाव येथे संत सावता महाराज व श्रीसंत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ३४ व्या अखंड हरिनाम सप्ताहाला भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दि. ६ ते १३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत झालेल्या या सप्ताहात ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन, प्रवचन, भजन, हरिपाठ यांसह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सप्ताहाच्या सातव्या दिवशी संत मदन महाराज देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांनी संत तुकाराम महाराजांच्या देवा आता ऐसा करी उपकार । देहेचा विसर पाडी मज या अभंगावर प्रभावी निरूपण केले. यावेळी त्यांनी मानवी जीवनातील खरे सुख हे भौतिक संपत्ती, सुख-सुविधा किंवा ऐहिक वैभवात नसून ईश्वरभक्ती, सदाचार आणि संतविचारांचे आचरण करण्यातच आहे, असा मोलाचा संदेश भाविकांना दिला.

ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल म्हणाले की, संसारातील मोह-माया आणि भौतिक आकर्षणांमध्ये अडकून न राहता मनुष्याने परमेश्वराच्या चरणी स्वतःला समर्पित करावे. सातत्याने नामस्मरण केल्याने मनाला शांती मिळते आणि आत्मिक समाधानाचा अनुभव प्राप्त होतो. मनाची एकाग्रता वाढवून विकारांपासून मुक्त होण्यासाठी प्रत्येकाने संतांच्या विचारांचा आधार घेतला पाहिजे.

अहंकार, क्रोध, लोभ, मोह, मत्सर आणि वासना या षड्रिपूंवर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. मनुष्याने आपले मन परमेश्वराच्या चरणी स्थिर करून सात्त्विक जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संतांच्या सहवासातून विचारांची शुद्धी होते, मनाला सकारात्मक दिशा मिळते आणि जीवनातील विविध अडचणींवर मात करण्याचे बळ प्राप्त होते, असेही त्यांनी सांगितले.

परमेश्वराकडे केवळ भौतिक सुख-सुविधांची मागणी करण्यापेक्षा भावशुद्ध सेवा, सद्विचार आणि भक्तीची प्राप्ती व्हावी, हीच संतांची खरी शिकवण असल्याचे ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांनी आपल्या निरूपणातून स्पष्ट केले.

या अखंड हरिनाम सप्ताहामुळे आनंदवाडी, सराटेवडगाव तसेच परिसर हरिनामाच्या गजराने भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे. दररोज होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांना परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहून संतवाणीचा लाभ घेत आहेत. सप्ताहाच्या निमित्ताने गावात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी तरुण पिढीने संतांचे साहित्य, अभंग आणि विचार समजून घेऊन ते आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावेत, असे आवाहनही करण्यात आले. संतांचे विचार केवळ ऐकण्यापुरते मर्यादित न ठेवता त्यांचा जीवनात प्रत्यक्ष



अवलंब केल्यास व्यक्ती, कुटुंब आणि समाजाच्या जीवनाला सकारात्मक दिशा मिळू शकते, असा संदेश या सप्ताहातून देण्यात आला.



आज १५ ऑगस्ट ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन वैद्यनाथ अर्बन को-ऑफ बॅंक शाखा गेवराई येथे आपला राष्ट्रध्वज तिरंगा ध्वजारोहण करून राष्ट्रगीताने राष्ट्रध्वजास सर्वांनी सलामी दिली यावेळी भाजपा नेते ॲड,श्री ज्ञानेश्वरराव खाडे , मॅनेजर सुर्यवंशी साहेब , जोगदंड साहेब ,मोटे साहेब , खंडेलवाल साहेब ,वादे साहेब , देशपांडे साहेब व शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते

# अंबाजोगाईत 'स्वातंत्र्य दिन' मोठ्या उत्साहात साजरा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुक्यात ठिकठिकाणी देशाचा ८० वा 'स्वातंत्र्य दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्य दिनानिमित्त शहरातील पोलीस परेड ग्राऊंडवर मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे - जिरंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पोलिसांनी ध्वजाला मानवंदना दिली. याप्रसंगी आमदार नमिता मुंदडा अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे, तहसीलदार विलास तरंगे उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर उपस्थितांना अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे आणि अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या मुख्य शासकीय ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला वरिष्ठ पोलिस अधिकारी, विविध शासकीय अधिकारी, विविध राजकीय पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, माजी सैनिक, सामाजिक कार्यकर्ते,



पत्रकार, वकील यासह सर्वच क्षेत्रातील मान्यवरांची, नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अंबाजोगाई शहरातील जिल्हा परिषद मैदानात नगरपरिषदेचे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नगरपरिषदेतही उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. अंबाजोगाई पंचायत समितीच्या प्रांगणातही गटविकास अधिकारी बळवंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी पंचायत समितीचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहरातील सर्व शासकीय - निमशासकीय कार्यालयात 'स्वातंत्र्य दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

अंबाजोगाई शहरातील सर्व शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था याही ठिकाणी स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. तसेच देशभक्तीपर गायन, नृत्याचे सादरीकरणही शैक्षणिक संस्थांमध्ये करण्यात आले.

# स्वातंत्र्याचा उत्सव गुणवंतांचा सन्मान अन् नव्या पिढीला प्रेरणेची शिदोरी

## धर्मवीर संभाजी हायस्कूलमध्ये ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहात मुक्ताई गुणवंत विद्यार्थी पुरस्काराने विद्यार्थ्यांचा गौरव

अंबड ।प्रतिनिधी

तालुक्यातील डोमेगाव येथील धर्मवीर संभाजी हायस्कूलमध्ये भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन देशभक्तीपूर्ण आणि उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी काढलेल्या प्रभात फेरीने गावात स्वातंत्र्यदिनाचा संदेश पोहोचविला. देशभक्तीपर गीतांचे गायन विद्यार्थ्यांची भाषणे आणि विविध उपक्रमांमुळे शाळेचा परिसर राष्ट्रप्रेमाने भारावून गेला.या कार्यक्रमात सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक रावसाहेब जायभाये यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.आपल्या प्रेरणादायी भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत उत्साह वाढविला.पालकांनी आपल्या पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे नियमितपणे शाळेत येऊन विद्यार्थी व



शिक्षकांच्या अडचणी समजून घ्याव्यात आणि शाळेशी सातत्यपूर्ण संवाद ठेवावा असे आवाहन त्यांनी केले.डोमेगावचे सरपंच डॉ.अशोक काळबंडे यांनी विद्यार्थी,पालक आणि शिक्षक हा शिक्षणाचा महत्त्वाचा त्रिकोण असल्याचे सांगितले. या तिन्ही घटकांमध्ये समन्वय आणि संवाद राहिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास अधिक प्रभावीपणे होऊ शकतो.पालकांनी शाळेच्या संपर्कात राहून आपल्या पाल्याच्या प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा असेही त्यांनी नमूद केले.आईच्या स्मृतीतून गुणवंतांना प्रेरणेची मुक्ताई शिदोरी कार्यक्रमाचे भावनिक वैशिष्ट्य ठरले ते माजी विद्यार्थी डॉ.संतोष शेळके यांनी आपल्या आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू केलेल्या मुक्ताई गुणवंत विद्यार्थी पुरस्कार सोहळ्याचे. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

इयत्ता दहावीमध्ये प्रथम क्रमांक मिळविणारा शुभम चंद्रकांत सांगळे याला १० हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह नववीत प्रथम आलेली साक्षी गणेश रणमळे हिला ५ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह तर आठवीत प्रथम आलेल्या कार्तिक रमेश सांगळे याला ३ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी डॉ. संतोष शेळके यांनी शाळेच्या ग्रंथालयाच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली. आईच्या स्मृतींना अभिवादन करताना विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी उचललेले हे पाऊल उपस्थितांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरले.

मुले हा देशाचा खजिना

कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शाळेचे मुख्याध्यापक जगन दुर्गे यांनी मनोगतात पालकांनी शिक्षकांच्या संपर्कात राहून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा असे आवाहन केले. गावातील प्रत्येक नागरिकाने विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त करताना ते म्हणाले मुले हा देशाचा खजिना आहेत. त्यांच्यात देशासाठी काहीतरी मोठे करण्याची क्षमता आहे. ही क्षमता ओळखून त्यांना घडविण्याचे काम शिक्षक करतात.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याण जायभाये यांनी केले तर नाटकर यांनी आभार मानले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक,पालक,शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



गेवराई तहसील च्या नवनियुक्त तहसीलदार श्रीमती गीतांजली गरड यांचे गेवराई तहसील ला नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे स्वागत करताना माजी मंत्री बदामराव पंडीत वा सामाजिक कार्यकर्ते जे. डी. शहा दिसत आहेत.

# टाकळी अमिया नदीवरील पुलाची दुरवस्था;जीवघेण्या खड्ड्यांसह लोखंडी गज उघडे,नागरिकांचा संताप

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया परिसरातील कांबळी नदीवरील पुलाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, या पुलावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या वर्षी आलेल्या महापुरात हा पूल वाहून गेला होता. तसेच पुलाच्या दोन्ही बाजूंचे रस्ते मोठ्या प्रमाणात खचले होते. त्यानंतर संबंधित प्रशासनाकडून करण्यात आलेली दुरुस्ती मात्र थातूरमातूर स्वरूपाची झाल्याचा आरोप परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

गेल्या वर्षभरापासून पुलावर मोठमोठे खड्डे पडले असून, वाहनधारकांना या खड्ड्यांतून जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. पुलावरील सिमेंटचा थर उखडून गेल्याने आतील लोखंडी गज उघडे पडले आहेत. हे लोखंडी गज धोकादायकरीत्या वर आले असून, त्यावरून वाहने गेल्याने दुचाकी तसेच चारचाकी वाहनांचे टायर वारंवार पंचर होत आहेत. त्यामुळे वाहनचालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून, गंभीर अपघाताची शक्यताही निर्माण झाली आहे.

पुलाजवळ दोन्ही बाजूंना मोठे खड्डे पडले आहेत. पुलावर प्रवेश करताना तसेच पुलावरून बाहेर पडताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या ठिकाणी पुरेशी सुरक्षितता नसल्याने अपघाताचा धोका अधिक वाढला आहे. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने त्यांची खोली लक्षात येत नसल्याने परिस्थिती आणखी धोकादायक बनली आहे.

या पुलाचा वापर रुईनालकोल, सराटेवडगाव, आनंदवाडी, नांदा, पिंपरी घुमरी, फत्तेवडगाव यांसह



परिसरातील अनेक गावांतील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी आणि वाहनचालक मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळे पुलाची तातडीने पक्की व दर्जेदार दुरुस्ती करणे अत्यावश्यक असल्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, कडा ते वाकी या रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवून अर्धवट राहिलेले रुंदीकरणाचे कामही तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच टाकळी ते रुईनालकोल रस्त्याचे रुंदीकरणाचे काम अर्धवट अवस्थेत राहिले असून तेही तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी रुईनालकोल, फत्तेवडगाव आणि पिंपरी घुमरी परिसरातील ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे केली आहे.

एकीकडे पुलाची दुरवस्था, दुसरीकडे रस्त्यावरील खड्डे आणि अर्धवट राहिलेले रुंदीकरणाचे काम यामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन पुलाची आणि रस्त्यांची दर्जेदार कामे पूर्ण करावीत. केवळ तात्पुरती डागडुजी न करता कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

पुलाची तातडीने दुरुस्ती करून लोखंडी गज हटवावेत, दोन्ही बाजूंचे खड्डे बुजवावेत तसेच कडा-वाकी आणि टाकळी-रुईनालकोल रस्त्यांचे रखडलेले रुंदीकरण पूर्ण करावे. प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा परिसरातील नागरिक व वाहनचालकांनी दिला आहे.

# स्व.पार्वतीबाई केशवराव फुंदे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## आदर्श माता,संस्कारांची शिदोरी आणि मायेची सावली हरपली

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) स्वर्गीय पार्वतीबाई केशवराव फुंदे, अर्थात आपल्या सर्वांच्या लाडक्या 'अक्का', यांचे शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने फुंदे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि परिचितांमध्ये शोककळा पसरली आहे. फुंदे परिवारातील प्रेम, माया, संस्कार, अध्यात्म, त्याग आणि माणुसकीचे प्रतीक असलेले एक जिव्हाळ्याचे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

स्व. पार्वतीबाई केशवराव फुंदे यांचे संपूर्ण आयुष्य हे देवभक्ती, कुटुंबवत्सलता, सेवा, त्याग आणि माणुसकीच्या मूल्यांनी समृद्ध होते. अत्यंत अध्यात्मिक आणि देवभक्त असलेल्या अक्कांच्या दैनंदिन जीवनात देवाचे नामस्मरण आणि भक्तीला विशेष स्थान होते. दररोज माऊली मंदिरात हरिपाठाला जाणे, देवाचे नामस्मरण करणे आणि मनोभावे पूजा-अर्चा करणे हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग होता. देवावरील त्यांची श्रद्धा अतूट होती. आयुष्यात अनेक संकटे आली, अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले; मात्र त्यांच्या मनातील श्रद्धा आणि परमेश्वरावरील विश्वास कधीही डळमळला नाही.

आयुष्यभर विविध आजारांनी त्यांना त्रास दिला. सन २०१० मध्ये त्यांच्यावर बायपास शस्त्रक्रिया झाली. त्यानंतर शुगर, बीपी तसेच कोरोनासारख्या कठीण परिस्थितींनाही त्यांनी अत्यंत धैर्याने तोंड दिले. मात्र संकटे कितीही मोठी असली तरी अक्कांनी कधीही मनोबल सोडले नाही. त्या प्रत्येक परिस्थितीला कणखरपणे सामोऱ्या गेल्या. विशेष म्हणजे या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य कायम राहिले. हसतमुख स्वभाव, सकारात्मक विचार आणि प्रत्येकाला आपलेसे करून घेण्याची वृत्ती ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खास ओळख होती.

सासू आणि सुनेचे नाते कसे असावे, याचा आदर्शच अक्कांनी आपल्या आचरणातून समाजासमोर ठेवला. त्यांच्या सुना त्यांच्यासाठी केवळ सुना नव्हत्या, तर त्या त्यांच्या जिवलग मैत्रिणींसारख्या होत्या. अक्कांनी आपल्या सुनांना प्रेम, माया, विश्वास आणि आपलेपणा दिला. सुनांनीही अक्कांचा शब्द, सन्मान आणि भावना आयुष्यभर जपल्या. परस्पर प्रेम, आदर आणि विश्वासाच्या बळावर त्यांनी हे नाते अत्यंत सुंदरपणे फुलवले. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत सासू-सुनेच्या नात्याचा एक आदर्श नमुना म्हणून अक्कांनी जपलेले हे नाते कायम स्मरणात राहील.

आपल्या मुलांवर उत्तम संस्कार करणे हीच अक्कांची जीवनातील मोठी साधना होती. त्यांनी आपल्या दोन्ही पुत्रांना प्रेम, शिस्त, माणुसकी, कर्तव्यभावना आणि समाजासाठी काहीतरी करण्याची शिकवण दिली. त्यांच्या संस्कारांची शिदोरी घेऊनच आत्माराम केशवराव फुंदे आणि यशवंत केशवराव फुंदे यांनी आपापल्या क्षेत्रात कर्तृत्व निर्माण केले.

आत्मारामजी फुंदे यांनी राजकारणात मोठी उंची गाठली. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासात अक्का सदैव खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. राजकारणाच्या धकाधकीच्या जीवनात कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे सांभाळत त्यांनी आत्मारामजींना कायम मानसिक आधार दिला. त्यांच्या यशामागे अक्कांनी दिलेले संस्कार, त्याग, संयम आणि खंबीर साथ यांचे मोठे योगदान होते. कुटुंबाच्या सुख-दुःखात सदैव खंबीरपणे उभे राहणे



आणि आपल्या माणसाला परिस्थितीशी लढण्याचे बळ देणे, हे अक्कांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य होते.

तर यशवंत केशवराव फुंदे सर यांनी आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत शिक्षक म्हणून समाज घडविण्याचे कार्य अखंडपणे सुरू ठेवले आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा आणि संस्कार त्यांना आपल्या कुटुंबातूनच मिळाले. आपल्या मुलांनी मोठे व्हावे, कर्तृत्ववान व्हावे, चांगला माणूस म्हणून समाजात उभे राहावे आणि समाजासाठी काहीतरी करावे, हीच अक्कांची मनापासून इच्छा होती. आपल्या मुलांच्या कर्तृत्वात आणि त्यांच्या सामाजिक योगदानात अक्कांच्या संस्कारांचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसून येते.

अक्कांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक मनाला भावणारा गुण म्हणजे अन्नदान आणि पाहुणचाराची त्यांना असलेली विलक्षण आवड. त्यांच्या घरी कोणीही आले, ओळखीचे असो अथवा अनोळखी त्या व्यक्तीला जेवू घातल्याशिवाय जाऊ देणे त्यांना कधीच मान्य नव्हते. 'घरी आलेला माणूस उपाशी जाऊ नये' ही भावना त्यांच्या मनात खोलवर रुजलेली होती. त्यांच्या हातचे अन्न हे केवळ जेवण नव्हते; त्या अन्नामध्ये मायेची ऊब, प्रेम, आपुलकी आणि आशीर्वाद सामावलेला असायचा. त्यामुळे त्यांच्या घरचा पाहुणचार अनुभवलेल्या प्रत्येकाच्या मनात अक्कांच्या आठवणी कायम राहतील.

अक्कांनी आयुष्यभर देवभक्ती, कुटुंबवत्सलता, माणुसकी, सेवा, प्रेम आणि संस्कार यांचा आदर्श आपल्या आचरणातून घालून दिला. त्यांनी जपलेली नाती, दिलेली माया, केलेला त्याग आणि पुढील पिढीला दिलेले संस्कार हीच त्यांच्या आयुष्याची खरी संपत्ती होती. त्या स्वतः साधेपणाने जगल्या; मात्र त्यांच्या विचारांची आणि संस्कारांची श्रीमंती फार मोठी होती.

आज अक्का आपल्यात प्रत्यक्ष नसल्या तरी त्यांच्या आठवणी प्रत्येकाच्या मनात कायम जिवंत राहतील. त्यांचा प्रेमळ स्वभाव, हसतमुख चेहरा, देवभक्ती, मायेची ऊब, आपुलकीचा पाहुणचार आणि प्रत्येकाला आधार देण्याची वृत्ती सदैव स्मरणात राहील. त्यांचे शरीर आपल्यातून गेले असले तरी त्यांनी दिलेले संस्कार, विचार, प्रेम आणि माणुसकीची शिकवण कधीही संपणार नाही. त्यांच्या संस्कारांचा वारसा पुढील पिढ्यांना कायम प्रेरणा देत राहील.

स्व. पार्वतीबाई केशवराव फुंदे यांच्या पश्चात त्यांचे पती केशवराव रघुनाथ फुंदे, तसेच आजिनाथ रघुनाथ फुंदे, देवराव रघुनाथ फुंदे, वामन रघुनाथ फुंदे, काशिनाथ नारायण फुंदे, गोरक्ष भगवान फुंदे आणि नवनाथ नाथा फुंदे हे कुटुंबीय व नातेवाईक आहेत. त्यांचे पुत्र आत्माराम केशवराव फुंदे व यशवंत केशवराव फुंदे, तसेच कन्या सौ. हर्षदा दिपक शिरसाठ यांच्यासह समस्त फुंदे परिवारावर दुःखाची छाया पसरली आहे.

दरम्यान, स्व. पार्वतीबाई केशवराव फुंदे यांच्या दशक्रिया विधीचा कार्यक्रम सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता नागतळा, ता. आष्टी, जि. बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. या दशक्रिया विधीस नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार, ग्रामस्थ आणि परिचितांनी उपस्थित राहून दिवंगत पार्वतीबाईंच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करावे, असे आवाहन समस्त फुंदे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

अक्का गेल्या, पण त्यांनी दिलेली माया गेली नाही; त्या निघून गेल्या, पण त्यांच्या आठवणी कधीही जाणार नाहीत. त्यांनी पेटवलेली संस्कारांची ज्योत पुढील पिढ्यांच्या जीवनात सदैव प्रकाश देत राहील. 'अक्का' हे नाव फक्त एका व्यक्तीचे नव्हते, तर ते प्रेम, माया, श्रद्धा, त्याग आणि माणुसकीचे प्रतीक होते.

ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो आणि फुंदे परिवारास हे अपरिमित दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच परमेश्वर चरणी मनःपूर्वक प्रार्थना. स्व. पार्वतीबाई केशवराव फुंदे (अक्का) यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



### लोकनेते स्व.विलासरावजी देशमुख व लोकनेते स्व.बाबुरावजी आडसकर स्मृती

## सदभावना समारोहात ७५ दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येते. अंबाजोगाईच्या सर्वांगिण विकासात प्रियदर्शनी क्रिडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाचे भरीव योगदान असल्याचे प्रतिपादन करून महाराष्ट्रासाठी लोकनेते स्व.विलासरावजी देशमुख आणि मराठवाड्यासाठी लोकनेते स्व.बाबुरावजी आडसकर यांनी विविध क्षेत्रात केलेले कार्य येणाऱ्या पिढ्यांकरीता प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार प्राचार्य किसनराव पवार यांनी काढले.

लोकनेते स्व.विलासरावजी देशमुख व लोकनेते स्व.बाबुरावजी आडसकर तीन दिवसीय स्मृती सदभावना समारोहात गुरूवारी राष्ट्रीय समाज प्रबोधनकार तथा किर्तनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे कीर्तन झाले. तर शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट रोजी मानव विकास मूकबधिर विद्यालयात आयोजित कार्यक्रमात मूकबधिर, मतिमंद, अस्थिव्यंग ७५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रियदर्शनी क्रिडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे राज्य उपाध्यक्ष राजकिशोर मोदी हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य किसनराव पवार, उपनगराध्यक्ष दिनेश भराडीया, नगरपरिषदेचे गटनेते सय्यद ताहेरभाई, योगेश्वरी नागरी सहकारी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन मनोज लखेरा, नगरसेवक अकबर पठाण, शिरीष भावठाणकर, नरेंद्र पटेल, सय्यद खलील जाफरी हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दिपप्रज्वलन करून तसेच लोकनेत्यांच्या प्रतिमांचे पुजन व अभिवादन करून करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत शब्द सुमनांनी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य विनायक मुंजे यांनी केले. प्राचार्य किसनराव पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोपपर भाषणात संयोजक राजकिशोर मोदी म्हणाले की, यावर्षी आयोजित स्मृतीप्रित्यर्थ सदभावना समारोहात ह.भ.प.इंदुरीकर महाराजांच्या प्रभावी व ओघवत्या शैलीतील कीर्तनामुळे कार्यक्रमस्थळी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. त्यांच्या विचारांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाली. थोर लोकनेत्यांचा वसा व वारसा प्रियदर्शनी क्रिडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळ जोपासत आहे. किर्तनास मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. यामध्ये युवक, ज्येष्ठ नागरिक व महिलांची उपस्थिती लक्षणिय अशी होती. इंदुरीकर महाराजांच्या प्रबोधनपर कीर्तनाने दिवंगत विलासराव देशमुख व बाबुरावजी आडसकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सदभावना समारोहाचा शुभारंभ

## आ.सुरेश धस यांच्या पुढाकाराचा सकारात्मक परिणाम;महाआरोग्य शिबिरातून गरजू रुग्णांना नवजीवन

### वारणी येथील सुभाष केदार यांच्यावर पाच लाखांपर्यंतची मणक्याची शस्त्रक्रिया मोफत ;आणखी दोन रुग्णांवर गुडघा सांधेरोपणाच्या यशस्वी शस्त्रक्रिया

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यदूत आ. सुरेश आण्णा धस यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून ६ ऑगस्ट २०२६ रोजी आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा सकारात्मक परिणाम आता प्रत्यक्ष रुग्णांच्या जीवनावर दिसून येत आहे. या शिबिरात केवळ तपासणी करून रुग्णांना घरी न पाठवता गंभीर आजार असलेल्या गरजू रुग्णांची निवड करून त्यांच्या पुढील उपचार व आवश्यक शस्त्रक्रियांची व्यवस्था करण्यात येत आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी हे महाआरोग्य शिबिर मोठा आधार ठरत असून, शिबिरातून निवड झालेल्या रुग्णांना मोफत उपचार मिळून त्यांच्या जीवनात नव्या आशेचा किरण निर्माण झाला आहे. याच उपक्रमातून शिरूर कासार तालुक्यातील वारणी येथील सुभाष देवराव केदार यांच्यावर अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये मणक्याच्या गादीची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली. सुभाष केदार हे महाआरोग्य शिबिरासाठी आले असता त्यांच्या आजाराची तातडीने दखल घेण्यात आली. कार्यकर्ते श्रीराम केदार यांनी त्यांच्या उपचाराबाबत आ. सुरेश धस यांच्याकडे माहिती दिल्यानंतर आ. धस यांनी तात्काळ आवश्यक मदत व उपचाराची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार सुभाष केदार यांना १० ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तपासणीनंतर त्यांच्या मणक्याच्या गादीची शस्त्रक्रिया करण्यात आली आणि उपचार यशस्वी झाल्यानंतर १५ ऑगस्ट रोजी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. या उपचारासाठी अंदाजे ४ लाख ५० हजार ते ५ लाख रुपये खर्च अपेक्षित होता. एवढा मोठा खर्च करण्याची आर्थिक क्षमता नसलेल्या केदार कुटुंबाला या शस्त्रक्रियेचा मोठा आर्थिक भार सहन करावा लागणार होता; मात्र आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत त्यांच्या संपूर्ण उपचाराचा खर्च झाल्याने कुटुंबावर कोणताही





आर्थिक भार पडला नाही. विशेष म्हणजे रुग्णालयातील नोंदणीसाठी भरलेली ५५० रुपयांची फी देखील परत करण्यात आली. त्यामुळे सुमारे पाच लाख रुपयांपर्यंत खर्च अपेक्षित असलेली मणक्याची शस्त्रक्रिया होऊनही सुभाष केदार यांना उपचारासाठी अक्षरशः एक रुपयाही खर्च करावा लागला नाही. महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मिळणाऱ्या मदतीचे हे एक महत्त्वपूर्ण उदाहरण मानले जात आहे. दरम्यान, आ. सुरेश धस यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या याच महाआरोग्य शिबिरात निवड झालेल्या आणखी दोन गरजू रुग्णांवर अहिल्यानगर येथील साईदीप सह्याद्री रुग्णालयात गुडघा सांधेरोपणाच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या. आष्टी तालुक्यातील कर्हेवडगाव येथील गोपीनाथ मारुती सानप आणि पाटोदा तालुक्यातील नफरवाडी येथील महादेव नरसिंग चव्हाण यांच्यावर गुडघ्याच्या मोफत शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या. साईदीप सह्याद्री रुग्णालयाचे चेअरमन डॉ. दीपक किरण यांच्या सहकार्याने डॉ. नालकर यांनी या दोन्ही शस्त्रक्रिया केल्या. दीर्घकाळापासून गुडघेदुखीमुळे त्रस्त असलेल्या या रुग्णांना महागड्या शस्त्रक्रियेचा खर्च परवडणे शक्य नसल्याने महाआरोग्य शिबिर त्यांच्या उपचारासाठी महत्त्वपूर्ण ठरले. शस्त्रक्रियेनंतर गोपीनाथ सानप आणि महादेव चव्हाण यांनी आ. सुरेश धस, डॉ. दीपक किरण, डॉ. नालकर तसेच उपचारासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. आता आम्ही पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहू शकतो, अशी भावना व्यक्त करत त्यांनी महाआरोग्य शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले. या उपचार प्रक्रियेत रुग्णसेवक विकास साळवे व अमर वाळके यांनीही मोलाचे सहकार्य केले. आष्टी विधानसभा मतदारसंघातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या उपचारांसाठी आयुष्यमान भारत योजना, मुख्यमंत्री सहायता निधी तसेच इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी आ. सुरेश धस यांचा पुढाकार सातत्याने महत्त्वपूर्ण ठरत आहे. अनेकदा गंभीर आजाराचे निदान झाल्यानंतर उपचारासाठी लागणारा मोठा खर्च कसा करायचा, हा प्रश्न आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसमोर निर्माण होतो. अशा परिस्थितीत शासकीय योजनांचा लाभ मिळवून देत गरजू रुग्णांना उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम या उपक्रमातून होत आहे. आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे शिबिरात रुग्णांची तपासणी करून त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन करण्याबरोबरच गंभीर आजार असलेल्या रुग्णांची निवड करून त्यांच्यावर प्रत्यक्ष उपचार व शस्त्रक्रिया होईपर्यंत पाठपुरावा केला जात आहे. त्यामुळे हे शिबिर केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता गरजू रुग्णांना उपचार मिळवून देणारे व्यापक आरोग्य अभियान ठरत आहे. सुभाष देवराव केदार यांच्यासारख्या रुग्णाची पाच लाख रुपयांपर्यंतची मणक्याची शस्त्रक्रिया मोफत होणे आणि गोपीनाथ मारुती सानप व महादेव नरसिंग चव्हाण यांच्यावर गुडघा सांधेरोपणाच्या शस्त्रक्रिया विनामूल्य होणे, यामुळे या उपक्रमाचा प्रत्यक्ष फायदा किती मोठ्या प्रमाणावर रुग्णांना होत आहे, हे स्पष्ट होत आहे. महागड्या उपचारांअभावी आजार सहन करणाऱ्या गरजू रुग्णांसाठी अशा आरोग्य उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळत असून त्यांच्या कुटुंबीयांवरील आर्थिक ताणही कमी होत आहे. महाआरोग्य शिबिर हे केवळ एक दिवसाचे शिबिर न राहता गरजू रुग्णांना प्रत्यक्ष उपचार व शस्त्रक्रिया मिळवून देणारे अभियान ठरत आहे, अशी भावना रुग्णांच्या नातेवाईकांकडून व्यक्त होत असून, आ. सुरेश धस यांच्या पुढाकारातून सुरू असलेल्या या रुग्णसेवेचे नागरिकांकडून समाधान व कौतुक व्यक्त केले जात आहे.

## आष्टी शहरात स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात संपन्न

१०१ फुटी तिरंग्याने वाढविला राष्ट्राभिमान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरात भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात, आनंदी व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील विविध शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, सामाजिक संस्था तसेच सार्वजनिक ठिकाणी उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. सकाळपासूनच संपूर्ण आष्टी शहर तिरंगामय झाले होते.

आष्टी शहरातील पीएम श्री जिल्हा परिषद कन्या प्रशाला, पंडित नेहरू विद्यालय, गणेश विद्यालय, वसुंधरा प्राथमिक विद्यालय, महात्मा गांधी विद्यालय, जिल्हा परिषद मुलांची माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आष्टी नंबर १, गंगुबाई प्राथमिक विद्यालय, छत्रपती शिवाजी विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आष्टी नंबर २, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भीमनगर, फिनिक्स विद्यालय, पिंपळेश्वर विद्यालय, आदर्श प्राथमिक शाळा, संस्कृती विद्यालय, गुरुकुल विद्यालय, पारेश्वर प्राथमिक शाळा, पब्लिक स्कूल आदी शाळांमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

तसेच ड.बी.डी. हंबर्डे महाविद्यालय, भगवान महाविद्यालय, आनंद शैक्षणिक संकुल आदी शैक्षणिक संस्थांमध्येही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सकाळी शहरातून उत्साहात प्रभात फेरी काढली. ढोल-ताशांच्या गजरात वाजत-गाजत निघालेल्या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत स्वातंत्र्य दिनाचा जयघोष केला. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागवली.

स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध शाळांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले.दरम्यान तहसील कार्यालय आष्टी, पंचायत समिती आष्टी, गटशिक्षणाधिकारी कार्यालय आष्टी, नगरपंचायत कार्यालय आष्टी, पोलीस स्टेशन आष्टी, डीवायएसपी कार्यालय आष्टी, न्यायालय आष्टी, बांधकाम विभाग आष्टी, ग्रामपंचायत कार्यालय मुर्शदपूर-कासारी आदी शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्येही उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले. संबंधित कार्यालयातील विभागप्रमुख व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत



राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली.

आष्टी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व नागरिकांच्या वतीने १०१ फूट उंच तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. आकाशात डौलाने फडकणाऱ्या भव्य तिरंग्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. या वेळी उपस्थित नागरिकांनी भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

शहरातील विविध शाळांमध्ये मुख्याध्यापकांच्या शुभहस्ते, महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांच्या हस्ते, शासकीय कार्यालयांमध्ये विभागप्रमुखांच्या हस्ते, तर विविध संस्थांमध्ये संस्थाध्यक्षांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

स्वातंत्र्य दिनानिमित्त आष्टी शहरातील वातावरणात विशेष उत्साह जाणवत होता. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत, महिला भगिनींपासून युवक-युवतींपर्यंत सर्वच स्तरातील नागरिकांनी स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. अनेक नागरिकांनी तिरंगा ध्वज हातात घेऊन देशभक्तीचा उत्साह व्यक्त केला.

या विविध कार्यक्रमांना राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, अधिकारी, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदविला. त्यामुळे आष्टी शहरात दिवसभर देशभक्तीचा उत्साह आणि राष्ट्राभिमानाची भावना पाहायला मिळाली. एकूणच भव्य १०१ फुटी तिरंगा, देशभक्तीपर घोषणा, प्रभात फेरी, विविध स्पर्धा आणि सर्वच स्तरातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे आष्टी शहरात ८० वा स्वातंत्र्य दिन अविस्मरणीय ठरला.

## कडा प्राथमिक आरोग्य केंद्राची 'मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिरा'त उत्कृष्ट कामगिरी;शेकडो रुग्णांना मोफत उपचारांचा लाभ

ग्रामीण भागातील रुग्णांना मोठा दिलासा; वैद्यकीय अधिकारी,आरोग्य कर्मचारी व सेवाभावी डॉक्टरांचा सत्कार

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यात नागरिकांना दर्जेदार आणि सहज आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिर' उपक्रमात कडा प्राथमिक आरोग्य केंद्राने उल्लेखनीय कामगिरी केली. उत्तम नियोजन, प्रभावी अंमलबजावणी आणि आरोग्य विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमामुळे कडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून तालुक्यात सर्वाधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. शेकडो नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन आणि उपचाराचा लाभ मिळाल्याने ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला.

या उल्लेखनीय कार्याबद्दल कडा ग्रामपंचायत, कडा कृषी उत्पन्न बाजार समिती, आष्टीचे आमदार सुरेश मित्र मंडळ, कडा शहरातील ग्रामस्थ व मान्यवरांच्या वतीने कडा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे-विधाते, डॉ. अमान बेग तसेच डॉ. सचिन टेकाडे, डॉ. संदिप टेकाडे, डॉ. विशाल हारकर, डॉ. श्रीकांत सांगळे, डॉ. उमेश गांधी, डॉ. गाडे आणि संपूर्ण आरोग्य कर्मचारी वर्गाचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, माजी सभापती संजयनाना ढोबळे, माजी सरपंच अनिलतात्या ढोबळे, ग्रामपंचायत सदस्य अन्सार सय्यद, महेश घोलप, बब्लू अखाडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांचा गौरव करून त्यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करण्यात आले.

'मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिर' या उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना त्यांच्या जवळच विविध आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे



हा आहे. कडा प्राथमिक आरोग्य केंद्राने या संधीचे प्रभावी नियोजन करत परिसरातील जास्तीत जास्त रुग्णांची तपासणी केली. रुग्णांना त्यांच्या आजारानुसार योग्य वैद्यकीय मार्गदर्शन देण्यात आले. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळाला.

या यशामध्ये डॉ. शिवानी बोडखे-विधाते आणि डॉ. अमान बेग यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घेतलेले परिश्रम अत्यंत महत्त्वाचे ठरले. प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य निरीक्षक, आरोग्य सेवक आणि इतर कर्मचाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

यावेळी आरोग्य सेवक बबन झगडे, आकाश फरांडे, एम.बी. दुनघव, आर.एम. काळे, बी.के. झगडे, तसेच श्रीमती एल.यु. आत्राम, श्रीमती एस.बी. गायकवाड, श्रीमती जे.सी. शेळके, श्रीमती एन.व्ही. मोरे, पी.टी. देसाई, श्रीमती ए.बी. धस, ए.एन. परकाळे, श्रीमती व्ही.एम. गुरसाळी, श्रीमती जे.आर. दातीर, विनायक धोंडे, सय्यद नदीम, आयुब यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महाआरोग्य शिबिरात मोफत एक्स-रे सेवा देणाऱ्या डॉक्टरांचा विशेष गौरव

या महाआरोग्य शिबिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे गरजू रुग्णांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली मोफत एक्स-रे सेवा. ग्रामीण भागातील अनेक रुग्णांना एक्स-रे तपासणीसाठी शहरात जावे लागते. त्यासाठी प्रवासाचा खर्च तसेच तपासणीचा आर्थिक भार सहन करावा लागतो. त्यामुळे या शिबिरात गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना मोफत एक्स-रेची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने त्यांना मोठा फायदा झाला.

ज्ञानेश्वर थोरात (एम-रे) यांच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी मोफत एक्स-रे काढण्याची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. दिवसभर कोणताही मोबदला न घेता रुग्णांची सेवा करत सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल त्यांचा आ. सुरेश धस मित्र मंडळ, कडा शहर यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी सेवाभावी डॉक्टर व आरोग्य क्षेत्रातील योगदान देणाऱ्या व्यक्तींचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना आरोग्य सेवा मिळवून देण्यासाठी डॉक्टरांनी केलेल्या या सहकार्याबद्दल ग्रामस्थांनी कृतज्ञता व्यक्त केली.

कडा प्राथमिक आरोग्य केंद्राने 'मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिरा'च्या माध्यमातून केलेली ही उत्कृष्ट कामगिरी ग्रामीण आरोग्य व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करणारी ठरली आहे. भविष्यातही अशाच प्रकारे जनहिताचे आणि गरजू रुग्णांना दिलासा देणारे आरोग्य उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षा यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# राजीव गांधी महाविद्यालयात 'हर घर तिरंगा' रॅली उत्साहात संपन्न



मुदखेड ।प्रतिनिधी

मुदखेड शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रकाश कोथळे, सहकार्यक्रमाधिकारी डॉ. सतीश उमाटे तसेच क्रीडा विभागप्रमुख डॉ. अर्जुनसिंह ठाकूर यांच्या नियोजन व आयोजनातून ही रॅली उत्साहात पार पडली. महाविद्यालयाच्या परिसरातून सुरू झालेली रॅली मुदखेड शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली.

रॅलीमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन देशभक्तीपर घोषणा देत नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल आदर व देशप्रेमाची भावना जागृत केली.

'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा फडकवून राष्ट्रीय एकात्मता, देशभक्ती आणि राष्ट्राभिमानाची भावना दृढ करावी, असा संदेश या रॅलीतून देण्यात आला.

# बीडच्या संत सावता महाराज मंदिराच्या सभागृहासाठी भरीव निधी देणार

## ना.पंकजाताई मुंडे यांची ग्वाही; माळी समाज बांधवांनी केला हृदय सत्कार

बीड ।प्रतिनिधी

बीडमधील संत सावता महाराज मंदिर परिसरातील सभागृह, भव्य डोम तसेच आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन टप्प्यात भरीव निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिली.

बीड शहरातील संत सावता महाराज मंदिरात ट्रस्टकडून ना.पंकजाताई मुंडे यांचा रविवारी (दि.१६) सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर, बीड नगरपरिषदेच्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नगरसेवक शुभम धूत, सावित्री नितीन साखरे, ट्रस्टचे पदाधिकारी नामदेव दुधाळ, मोहन गोरे, शामसुंदर घाडगे,



समता परिषद जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहराध्यक्ष नितीन राऊत, महात्मा फुले युवा दलाचे अध्यक्ष ड. सतीश शिंदे, दिनकर जमदाडे, सिताराम पानखडे, सचिन दुधाळ, रमेश दुधाळ, विष्णू यादव, महेश राऊत, बाळासाहेब धोत्रे, मंगेश जमदाडे, महेश चौधरे, संतोष गवळी, सुबोध शिंदे, छाया लांडगे, अलका राऊत, चित्रा घाडगे, आशा गोरे, मंदा राऊत, प्रियांका गोरे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, संत सावता महाराज मंदिराची पायाभरणी सुरू असताना आपण या ठिकाणी आले होते. मंदिरासाठीची जागा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी उपलब्ध करून दिली. आता मंदिर परिसराच्या विकासासाठी डॉ.योगेश क्षीरसागर हे पाठपुरावा करत आहेत. त्यांच्यासह सहकाऱ्यांनी भव्य डोमच्या बांधकामासह विविध सुविधांसाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. समाजाची मागणी आणि मंदिर परिसराच्या विकासाची गरज लक्षात घेऊन जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन टप्प्यांत भरीव निधीची तरतूद करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. संत सावता महाराज मंदिर परिसराच्या विकासामुळे भाविकांसह समाजबांधवांना विविध सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, समाजपयोगी उपक्रमांसाठी सभागृह उपयुक्त ठरणार आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*डॉ.क्षीरसागरांसह पदाधिकाऱ्यांनी मुंबईत भेटून दिले होते आमंत्रण

### लोकहिताच्या कार्यात अग्रेसर असणारे पत्रकार चंद्रकांत दादा पाटील यांना

# मान्यवरांच्या उपस्थितीत आणि उत्साही वातावरणात वाढदिवसाच्या शुभेच्छा

बीड ।प्रतिनिधी

सदैव लोकहिताच्या आणि सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे व्यक्तिमत्त्व, भारतीय जनता मजदुर संघाचे मराठवाडा सचिव तथा दैनिक समर्थ राजयोग केज तालुका प्रतिनिधी व 'स्वाभिमानी न्यूज चॅनल'चे मुख्य संपादक चंद्रकांत दादा पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना



भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके, लेक लाडकी अभियानाचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, पत्रकार किशोर देवा कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बाजीराव ढाकणे यांनी चंद्रकांत दादा पाटील यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देताना त्यांच्या सामाजिक व पत्रकारितेच्या कार्याचे कौतुक केले. लोकहिताचे प्रश्न सातत्याने मांडत राहून समाजातील वंचित, कष्टकरी आणि सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे,असे मत त्यांनी व्यक्त केले.

चंद्रकांत दादा पाटील यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी आणि सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील कार्यासाठी भरभरून यश लाभो,हीच मनःपूर्वक सदिच्छा, असे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी ही चंद्रकांत दादा पाटील यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देत त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

याप्रसंगी भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी चंद्रकांत दादा

पाटील यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याचा गौरव करत त्यांना निरोगी व दीर्घायुष्या साठी शुभेच्छा दिल्या आहेत.



**नायगाव तालुक्यातील मनोज पाटील मोरे यांनी आज १५ ऑगस्ट रोजी भारतीय स्वतंत्र्याच्या दिवशी थायलंड येथे भारत मातेच्या काहीतरी देणे लागतो या उदाहरणांतकरणातून या भावनेने सकाळी सात वाजता थायलंड येथे भारत मातेचा झेंडा फडकावला आहे यावेळी तिथेच विविध सामाजिक उपक्रम राबविले आहे. भारतमातेच्या प्रति असलेल्या जिव्हाळा भारत मातेच्या प्रेम भाव समाजासाठी काहीतरी देणे लागतो या भावनेतून थायलंड येथे ध्वज फडकवला आहे विद्यार्थी सह कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते**



**भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईत मंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन बीड शहरातील संत सावता महाराज मंदिराला भेट देण्याचे आमंत्रण दिले होते. त्यानुसार पंकजाताई मुंडे यांनी मंदिराला भेट देऊन सत्कार स्वीकारला. तसेच मंदिर परिसराच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.**

# हिमायतनगर तालुक्यात व्यसनमुक्तीसाठी पोलिसांचे जनजागृती अभियान

हिमायतनगर : तालुक्यात वाढत्या व्यसनाधीनतेला आळा घालण्यासाठी हिमायतनगर पोलिस स्टेशनच्या वतीने व्यसनमुक्ती जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. व्यसनापासून दूर राहा; आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करा, असे आवाहन पोलिसांकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

पोलिस निरीक्षक लक्ष्मणराव केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध खेडेगाव, वाडी व तांड्यांवर जाऊन नागरिकांना व्यसनमुक्तीबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.



डॉक्टर, समाजसेवक तसेच पत्रकार यांच्या माध्यमातूनही नागरिकांमध्ये व्यसनाच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती केली जात आहे.

व्यसनामुळे व्यक्तीच्या आरोग्यावर तसेच कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे युवकांसह नागरिकांनी व्यसनापासून दूर राहून निरोगी व सुरक्षित जीवन जगावे, असे आवाहन हिमायतनगर पोलिसांनी केले आहे.

या अभियानामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत होत असून, व्यसनमुक्त गाव, सुरक्षित कुटुंब या दिशेने जनजागृतीला चालना मिळत आहे.

# जुगार अड्ड्यावर भोकर SDPOची धाड; तामसा पोलीस नेमके करत होते तरी काय ?

## आष्टी तांडा शेतशिवारातील कारवाई; २५ जणांविरुद्ध गुन्हा, १.४३ लाखांचा मुद्देमाल जप्त

तामसा ।प्रतिनिधी

हदगांव च्या तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आष्टी तांडा शेत शिवारात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर भोकर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने धाड टाकून २५ जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ४३ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.५० वाजण्याच्या सुमारास आष्टी तांडा शेतशिवारात काही जण अंदर-बाहेर नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती भोकर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाला मिळाली होती. त्यानुसार विशेष पथकाने घटनास्थळी धाड टाकली. अचानक झालेल्या या कारवाईत २५ जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून रोख ६० हजार ३७० रुपये, १५ मोबाईल फोन किंमत ८३ हजार ५०० रुपये, ५२ बदक छाप पत्ते व इतर जुगार साहित्य जप्त करण्यात आले.

या प्रकरणात अमोल बाबुराव जाधव (वय ३२, रा. पोटा, ता. हिमायतनगर), प्रकाश तुकाराम आडे (वय ४०, रा. आष्टी तांडा, ता. हदगाव), उत्तम सेवा जाधव (वय ५०, रा. आष्टी तांडा, ता. हदगाव), राम फकीरराव आडे (वय ३०, रा. आष्टी तांडा, ता. हदगाव), परमेश्वर गणेश माने (वय २४, रा. पोटा, ता. हिमायतनगर), मारोती किशनराव माने (वय ३०, रा. पोटा, ता. हिमायतनगर), अनिकेत मारोती बुटले (रा. पोटा, ता. हिमायतनगर), दिपक गणेश सावंत (वय ३५, रा. खैरगाव, ता. हिमायतनगर), परमेश्वर विश्वंभर आवताडे (वय २५, रा. वटफळी, ता. हिमायतनगर), दत्ता साहेबराव आवताडे (वय २५, रा. वटफळी, ता. हिमायतनगर), योगेश मारोती माने (वय २१, रा. पोटा, ता. हिमायतनगर), मनोज बंडू शिंदे (वय २६, रा. दगडवाडी, ता. हदगाव), चांदराव नानाराव शिंदे (वय ५१, रा. येवली, ता. हदगाव), सुभाष सटवाजी येनगेवाड (वय ५२, रा. येवली, ता. हदगाव), सोमनाथ बालाजी सोनटक्के (वय २५, रा. येवली, ता. हदगाव), किशोर वसराम राठोड (वय ४०, रा. आष्टी तांडा, ता. हदगाव), अमोल दिलीप वानखेडे (वय ४०, रा. दगडवाडी, ता. हदगाव), भगवान पांडू आडे (वय २३, रा. आष्टी तांडा, ता. हदगाव), सुनील बालाजी माने (वय ३७, रा. पोटा, ता. हिमायतनगर), नितीन फकीरा आडे (रा. आष्टी तांडा, ता. हदगाव), साहेबराव मन्सी पवार (रा. वाई तांडा, ता. मुदखेड), आनंदराव वामनराव शिंदे (रा. येवली, ता. हदगाव), खंडू भैरोबा शिंदे (वय ४०, रा. पोटा, ता. हिमायतनगर), राजू बन्सी राठोड (वय ३०, रा. कोका तांडा, ता. हिमायतनगर) आणि आकाश शामराव पवार (वय ३०, रा. कांडली, ता. हदगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र या कारवाईनंतर तामसा परिसरात चर्चांना उधाण आले आहे. ज्या ठिकाणी तब्बल २५ जणांचा जुगार अड्डा सुरू होता, त्या ठिकाणी कारवाई करण्यासाठी भोकर डउझज कार्यालयाच्या पथकाला थेट तामसा हद्दीत यावे लागले. त्यामुळे तामसा पोलीस नेमके करत होते तरी काय? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, परिसरात अवैध जुगार सुरू असल्याच्या चर्चा यापूर्वीही होत होत्या. असे असताना स्थानिक पोलिसांना याची माहिती नव्हती का, की माहिती असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, याबाबत संशय व्यक्त केला जात आहे. या कारवाईमुळे तामसा पोलीस ठाण्याच्या आवारात रात्री उशिरापर्यंत लोकांच्या जमावाडा होता..अधिकृत नोंदीनुसार १ लाख ४३ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असला तरी घटनास्थळी यापेक्षा अधिक रकमेची उलाढाल सुरू असल्याची चर्चा स्थानिक स्तरावर



रंगली आहे. काही नागरिकांकडून चार ते पाच लाख रुपयांच्या व्यवहाराचा दावा केला जात असला तरी त्यास अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.तामसा परिसरात अवैध जुगार, अवैध दारू विक्री, वाळू तस्करी आणि इतर बेकायदेशीर धंद्यांबाबत वारंवार तक्रारी समोर येत असताना बाहेरील पथकाने केलेल्या या कारवाईमुळे स्थानिक पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. पोलीस उपनिरीक्षक संभाजी हनवते यांच्या फिर्यादी वरून २५ लोकांना ताब्यात घेऊन तामसा पोलीस ठाण्याचा पोहेको शंकर मुकाडे कडे तपास दिले या प्रकरणाचा पुढील तपास तामसा पोलीस ठाण्याकडून सुरू असून, या तपासातून आणखी कोणती माहिती समोर येते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे...

# मयूर सार्वजनिक वाचनालयात गुणवंतांचा भव्य सत्कार संपन्न; विविध क्षेत्रांतील यशाचा गावकऱ्यांकडून गौरव

पाटोदा ।प्रतिनिधी

मयूर सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शैक्षणिक, आरोग्य व कृषी क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करून गावाचा नावलौकिक वाढवणाऱ्या गुणवंतांचा भव्य सत्कार समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. गावातील तरुणांना प्रेरणा मिळावी आणि त्यांच्या कष्टांची योग्य दखल घेतली जावी, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सत्कारमूर्तींचा गौरव

कार्यक्रमात नायगावचे भूमिपुत्र प्रा. डॉ. जावेद करीम शेख यांनी ग्रंथालय शास्त्र या विषयात सर्वोच्च शैक्षणिक मानली जाणारी 'पीएच.डी.' (डॉक्टरेट) पदवी संपादन केल्याबद्दल त्यांचा विशेष नागरी सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे, नागपूर येथे आरोग्य विभागात आरोग्य सेवक पदी निवड झाल्याबद्दल श्री. सोफियान (सोनू) पठाण व कृषी सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल श्री. बालाजी कवठेकर यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यास मयूर नगरीचे प्रथम नागरिक संदीप दादा कवठेकर, उपसरपंच बाबा भाई



पठाण, माजी सरपंच तथा मयूर मित्र मंडळाचे अध्यक्ष शाहीद सय्यद सर, माजी उपसरपंच अशोक अण्णा सुपेकर, पोलीस पाटील साईनाथ मोहळकर, ग्रामपंचायत सदस्य राहुल दादा वनवे, रवींद्र निकम, सोनू पठाण, इस्माईल पठाण, डॉ. शगीर पठाण, डॉ. साजिद पठाण, तय्यब पठाण, माजी ग्रामपंचायत सदस्य अशोक दादा मोहळकर, सेवा सोसायटीचे सचिव पवन भोसले, गोपीचंद औटे, आकाश मोहळकर, प्रेमचंद खेडकर, अमोल वाघुले, युवा नेते सुरज बांदल, प्रदीप वणवे, जमील पठाण, बाबू नामदार, समीर पठाण, असलम पठाण, अतिक पठाण यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा, उच्च शिक्षण व शासकीय सेवेमध्ये भरारी घेऊन गावाचे नाव उंचावले पाहिजे, असा सूर यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. मयूर सार्वजनिक वाचनालयाने गुणवंतांचा सन्मान करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केल्याबद्दल परिसरातील सर्व स्तरातून या उपक्रमाचे मनापासून कौतुक होत आहे.

# सुगाव (बु.) येथे ग्रामपंचायत अभावी रस्त्यावर ग्रामसभा; निधी असूनही इमारतीचा प्रश्न कायम

मुखेड ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील सुगाव (बु.) येथे ग्रामपंचायतीची स्वतंत्र इमारत नसल्याने ग्रामसभा चक्क रस्त्यावर भरवण्याची वेळ आली. देव आला द्यायला परंतु पदर नाही घ्यायला म्हटल्याप्रमाणे अनेक ठिकाणी निधी अभावी कामे रखडतात तर काही ठिकाणी निधी असून निधीचा उपयोग होतं नाही. सुगाव बु ग्रामपंचायतीची जुनी व जीर्ण इमारत पाडून अनेक वर्षे उलटली असून, नवीन इमारतीसाठी निधी उपलब्ध असतानाही जागेच्या प्रश्नामुळे बांधकाम रखडले आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे.

ग्रामसभेत ग्रामस्थांनी प्रशासनाला जाब विचारत, निधी उपलब्ध आहे, मग जागेचा प्रश्न कधी सुटणार? असा सवाल उपस्थित केला. मागील दहा ते पंधरा वर्षांपासून ग्रामपंचायतीचा कारभार योग्य इमारतीअभावी सुरू असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

ग्रामविकास अधिकारी नागरगोजे यांनी ग्रामपंचायत इमारतीसाठी निधी उपलब्ध करून आणला आहे. मात्र, बांधकामासाठी आवश्यक जागेचा प्रश्न अद्याप कायम असल्याने निधीचा उपयोग करता आलेला नाही. ग्रामपंचायत इमारत तसेच अंगणवाडीचे बांधकाम आगामी १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी ग्रामसभेत केली.दरम्यान, स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रमही रस्त्यावरच आयोजित करण्यात आला. रस्त्यावर पाणी साचलेले असतानाही जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. काही विद्यार्थ्यांनी भारत देशाविषयी मनोगत व्यक्त करून कार्यक्रमात उत्साह निर्माण केला.शाळेच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

सुगाव (बु.) येथील जिल्हा परिषद शाळा मुख्य रस्त्यालगत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ग्रामसभेत चर्चेला आला. या मार्गावर अधूनमधून अपघात होत असल्याने शाळेत जाणाऱ्या-येणाऱ्या लहान मुलांच्या सुरक्षेबाबत पालकांमध्ये चिंता आहे. त्यामुळे शाळा सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावी, अशी मागणी काही पालकांनी केली.

गावातील अंगणवाडीची अवस्थाही चिंताजनक असून, सध्या समाजमंदिरात अंगणवाडी भरवली जात आहे. लहान मुलांना बसण्यासाठी योग्य सुविधा उपलब्ध नसल्याने स्वतंत्र अंगणवाडी इमारत तातडीने बांधण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

ग्रामसभेत पाणी, रस्ते, ग्रामपंचायत इमारत आणि अंगणवाडी यांसह विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली.

# आरोग्य सेवेच्या माध्यमातून आ. भीमराव केराम यांचा वाढदिवस लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा

किनवट ।प्रतिनिधी

किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमरावजी केराम यांच्या वाढदिवसानिमित्त यंदा धार्मिक, सामाजिक आणि आरोग्यविषयक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वाढदिवस केवळ शुभेच्छा स्वीकारण्यापुरता मर्यादित न ठेवता आरोग्यसेवेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. नेत्र तपासणी, मोफत चष्मेवाटप, शस्त्रक्रिया, रक्तदान, रक्त तपासणी तसेच सिकल सेल तपासणी अशा विविध उपक्रमांमुळे हजारो नागरिकांना थेट आरोग्यसेवेचा लाभ मिळाला.

दि. १४ ऑगस्ट रोजी किनवट येथील कलावती गार्डन येथे आयोजित भव्य मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात तब्बल ३५०० हून अधिक नेत्ररुग्णांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान सुमारे ८०० रुग्णांना मोतीबिंदू तसेच अन्य नेत्रशस्त्रक्रियांची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. या रुग्णांवर नागपूर येथील पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांच्या महात्मे नेत्र रुग्णालयात मोफत शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. संबंधित रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी नागपूर येथे ने-आण करण्यासाठी मोफत बससेवेची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली असून, ही सेवा डॉ. महात्मे ट्रस्ट आणि संदेश भाऊ केराम सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त पुढाकारातून करण्यात आली आहे. नेत्र तपासणीसोबतच दृष्टीदोष असलेल्या गरजू रुग्णांसाठी मोफत चष्मेवाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत १,२४३ नागरिकांना मोफत चष्मे देण्यात आले. ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना त्यांच्या परिसरातच तपासणी व उपचाराची सुविधा मिळाल्याने अनेक गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळाला. आर्थिक परिस्थितीमुळे नेत्र तपासणी अथवा उपचारांकडे दुर्लक्ष करणाऱ्या नागरिकांसाठी हा उपक्रम विशेष महत्त्वाचा ठरला. वाढदिवसानिमित्त दि. १५ ऑगस्ट रोजी आयोजित भव्य रक्तदान शिबिरालाही मोठा प्रतिसाद मिळाला. तरुणांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ५०० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. वाढदिवसाच्या शुभेच्छांसोबत रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. याच शिबिरात १५४ नागरिकांची मोफत रक्त तपासणी, तसेच सिकल सेल आजाराच्या १७ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यामुळे रक्तदान शिबिराला व्यापक आरोग्य तपासणी उपक्रमाचे स्वरूप प्राप्त झाले.

आमदार केराम यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यातील विविध नेत्यांनीही त्यांना शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार बाबुराव कोहळीकर यांच्यासह विविध पक्षांचे आमदार, माजी आमदार, पदाधिकारी व ज्येष्ठ नेत्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून तसेच दूरध्वनीवरून शुभेच्छा दिल्या. दरवर्षी वाढदिवसानिमित्त दूरध्वनीवरून शुभेच्छा देणारे दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचीही यावेळी आमदार केराम यांनी आवर्जून आठवण काढली. किनवट शहरातील कलावती गार्डन येथे सुरू असलेल्या विविध आरोग्य शिबिरांना आमदार केराम यांनी भेट देऊन किनवट व माहूर तालुक्यांतून आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी विधानसभा मतदारसंघाच्या विविध भागांतून सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, हितचिंतक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले



होते. उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी विविध वर्तमानपत्रांच्या विशेषांकांचे विमोचनही करण्यात आले.

दरम्यान, वाढदिवसाच्या दिवशी पहाटे आमदार भीमराव केराम यांनी दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे तालुक्यातील जागृत देवस्थान मौजे नागढव येथील श्री नागनाथांचे दर्शण करत सहकुटुंब पूजा-अर्चा व महाअभिषेक करून दिवसाची सुरुवात केली. यावेळी मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. मंदिर संस्थानचे अध्यक्ष मुक्तिराम घुगे यांनी संस्थेच्या वतीने आमदार केराम यांचे अभिष्टचिंतन केले. यावेळी भजन व भक्ती गीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या धार्मिक कार्यक्रमास युवा नेते ड. प्रतीक केराम, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, समितीचे अध्यक्ष बाबुराव केंद्रे, बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे-पाटील, माजी सभापती दत्ता आडे, उद्योजक अरुण उपलेंचवार, कंत्राटदार उत्तम जाधव, पाणंद रस्ते समितीचे सदस्य सागर पिसारीवार, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, विवेक केंद्रे, गणपत मुंडे, रमेश बद्दिवार, दयानंद दराडे, बाजार समितीचे संचालक बालाजी बामणे, युवा उद्योजक रवी चव्हाण, प्रदीप एडके, बालाजी फड, राहुल दारगुलवार, पत्रकार मधुकर अन्नेलवार, कचरू जोशी, शैलेश अत्राम यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. एकूणच, धार्मिक श्रद्धेपासून सामाजिक बांधिलकीपर्यंत आणि आरोग्यसेवेपासून जनसंपर्कापर्यंत विविध पैलूंनी आमदार भीमराव केराम यांचा वाढदिवस साजरा झाला. ३५०० हून अधिक नेत्ररुग्णांची तपासणी, सुमारे ८०० रुग्णांच्या मोफत शस्त्रक्रियांची व्यवस्था, १,२४३ गरजू नागरिकांना चष्मेवाटप आणि ५०० हून अधिक नागरिकांचे रक्तदान या उपक्रमांमुळे वाढदिवसाला व्यापक समाजोपयोगी स्वरूप प्राप्त झाले. ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा त्यांच्या जवळच्या परिसरात उपलब्ध करून देणे, गरजू रुग्णांना उपचारासाठी मदतीचा हात देणे आणि रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमांतून जनतेचा सहभाग वाढविणे, या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यामुळे यंदाचा वाढदिवस हा केवळ उत्सव न राहता 'सेवा, आरोग्य आणि सामाजिक बांधिलकीचा उत्सव' ठरल्याचे चित्र किनवटमध्ये पाहायला मिळाले.

## महान गायक स्व किशोरकुमार जयंती- अंबाजोगाईत संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दि ४ ऑगस्ट २६ रोजी महान गायक स्व. किशोरकुमार यांचा जयंतीनिमित्त आंबगोगाईत स्वयंवर मंगल कार्यालयात किशोर फॅन्सक्लब चे अध्यक्ष मिलिंद मस्के यांनी आयोजन केले.या कार्यक्रमात अंबाजोगाई आणि बाहेरून गायक गायिका उपस्थित राहून सूरसुमनांजली अर्पित करण्यात आली. ४ ऑगस्ट हा स्व. किशोरकुमार यांचा वाढदिवस असल्याने मोठा केक कापून जन्मोत्सव साजरा करण्यात आला. मिलिंद मस्के हे मोठे किशोर दांचे चाहते आहेत. बऱ्याच वर्षापासून ते हा कार्यक्रम आयोजित करतात,या वेळी त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणात आयोजन केले.

यावेळी डॉ राजेश इंगोले,तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, प्रा राजकुमार ठोके,मिलिंद मस्के यांच्यासह मंजुषा देशपांडे, आरती कुलकर्णी, मयुरी मजगे,सुभाष शेप,अभय जोशी, डॉ संदीप जैन,डॉ चामनर, डॉ कस्तुरे,राज माने,दिपक बिडवे,श्रीधर देशपांडे, सचिन चिंतावार,शंकर वावदाने या आणि बऱ्याच गायक- गायिकांनी आपल्या सुरेल गीतांनी प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रम सूत्रसंचनल परमेश्वर गित्ते यांनी अतिशय बहरदार पणे केले.

# पाटोदा वकील संघाची कार्यकारणी बिनविरोध

## अध्यक्षपदी ॲड. चंद्रकांत जावळे, उपाध्यक्ष ड जब्बार पठाण तर सचिव पदी ॲड विलास पवार

पाटोदा ।प्रतिनिधी

प्रतिवर्षीप्रमाणे पाटोदा वकील संघाची यंदाची कार्यकारणीही बिनविरोध निवडण्याची परंपरा कायम राहिली. मावळते अध्यक्ष ॲड. बी. आर. लवूळ यांच्या उपस्थितीत झालेल्या निवड प्रक्रियेत अध्यक्षपदी ॲड. चंद्रकांत जावळे, उपाध्यक्षपदी ॲड. जब्बार पठाण, तर सचिवपदी ॲड. विलास पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.नूतन कार्यकारणीत सहसचिवपदी ॲड. श्वेता राख, कोषाध्यक्षपदी ॲड. अविनाश जगदाळे, ग्रंथपालपदी ॲड. सुधीर एकबोटे, प्रसिद्धीप्रमुखपदी ॲड. महेश बेदरे, तर महिला प्रतिनिधी म्हणून ॲड. पूनम शहाणे व ॲड. दिपाली पांडव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

पाटोदा वकील संघाच्या माध्यमातून वकिलांच्या विविध प्रश्नांसाठी तसेच न्यायव्यवस्थेशी संबंधित उपक्रमांसाठी सातत्याने काम केले जाते. दरवर्षी निवडणूक न घेता सर्वानुमते कार्यकारणी निवडण्याची संघाची परंपरा यंदाही कायम राहिल्याने वकिलांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

नूतन कार्यकारणीचा उपस्थित ज्येष्ठ विधिज्ञ व वकील बांधवांच्या वतीने सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. तसेच नूतन पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्यायावेळी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. रवींद्र औटे, ॲड. यू. बी. जाधव, ॲड. एन. जी. जाधव, ॲड. एम. व्ही. जाधव, ॲड. पांडव, ॲड. एस. बी. जावळे, ॲड. सय्यद अश्रफ, ॲड. शेख, ॲड. देशमुख, ॲड. ऋषिकेश डबीर, ॲड. ए. एम. जगदाळे, ॲड. सुशील कोठेकर, ॲड. सुधीर घुमरे, ॲड. बी. डी. तळेकर, ॲड. पारगावकर, ॲड. विशाल मस्के, ॲड. तुषार जाधव, अड. तात्यासाहेब तवार, ॲड. डी. एन. पारगावकर यांच्यासह पाटोदा वकील संघातील सर्व सदस्य वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांना वह्या, छत्री आणि शैक्षणिक साहित्य भेट

## यशराज पंडित यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

गेवराई ( प्रतिनिधी ) माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचे चिरंजीव यशराज पंडित यांचा दिनांक १६ ऑगस्ट २०२६ रोजी विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय जनता पार्टीचे युवा नेते यशराज बदामराव पंडित यांचा दिनांक १६ ऑगस्ट २०२६ रोजी वाढदिवस असल्याने त्यांना शुभेच्छा देण्यासाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी निवासस्थानी सकाळपासूनच त्यांच्या चाहत्यांनी आणि भाजप कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी सौ गिरीकाभाभी पंडित आणि सौ अनुरूपाताई पंडित यांनी यशराज पंडित यांचे औक्षण केले. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी सभापती युधाजित पंडित यांनी आशीर्वाद दिले. गेवराई तालुक्यासह जिल्हाभरातून आलेल्या विविध सामाजिक, शैक्षणिक कला आणि क्रीडा क्षेत्रासह राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी यशराज पंडित यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन सत्कार करत अक्षरशः शुभेच्छांचा वर्षाव केला.तळवट बोरगाव येथील नारायण गाडे यांनी यशराज पंडित यांची बैलगाडी मधून गावातून मिरवणूक काढत त्यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना छात्रांसह शैक्षणिक साहित्य वाटप केले. यावेळी संस्थेचे संचालक सुभाष जगताप, सरपंच अलकाताई गाडे, उपसरपंच रंगनाथ भाऊ, पोलीस पाटील सुधाकर गाडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. मनोहर बाबुराव डरफे यांनी गावांमध्ये ग्रामस्थांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे भेट दिले. मौजे खेरडा बुद्रुक येथील उपसरपंच शिवाजी राऊत यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना वहंसह शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक उपक्रम राबवला. यावेळी माऊली रडे, मुकुंद रडे, अमृत ठोसर, आनंद त्रिभुवन, शेख सर, सी एच ओ पाठक मॅडम, सिस्टर दळवे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. काठोडा तांडा येथे सरपंच गणेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. त्यासोबतच ऊसतोड मजूर बांधव व निराधार महिलांना किराणा किटचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपणारा स्तुत्य उपक्रम राबवला.गेवराई मतदार संघातील विविध गावांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. कार्यकर्त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा केल्याबद्दल यशराज पंडित यांनी सर्वांचे आभार मानले.




## रोडगी शाळेतील वेद काकडेचे भारत टॅलेंट सर्च परीक्षेत यश

अर्धापूर (प्रतिनिधी)

भारत टॅलेंट सर्च परीक्षा - २०२६ मध्ये रोडगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी वेद विठ्ठल काकडे याने घवघवीत यश संपादन केले आहे. त्याचा यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



अर्धापूर तालुक्यातील रोडगी येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता ४ थी मध्ये शिकणाऱ्या वेद काकडे याने राज्यस्तरीय परीक्षेत ६४ गुण मिळवून राज्य गुणवत्ता यादीत ३७६ वा क्रमांक पटकावला आहे. त्याच्या या यशाबद्दल रोडगी येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक राजाराम राठोड, शिक्षक सचिन काळे, लक्ष्मण वाघमारे, अरुण बोबडे, सौ. संगीता धोंगडे, सरपंच सौ.सरिता दगडू काकडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष काकडे, दगडूजी काकडे,राजु सितापराव,गणेश काकडे,गजानन काकडे ,सतीश जाधव, बळीराम काकडे आदीसह ग्रामस्थांनी व पालकांकडून त्याचा यशाबद्दल कौतुक होत आहे.